| | | | |
|---|---|---|---|
| सहामाही | ” २ | ” | ०८ |
| सालअखेर | ” ७ | ” | १०८ |
| किरकोळ अंकास | | | ०४ |

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly............3 ” 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 21 SEPTEMBER 1891 — NO. 37

वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख २१ माहे सप्टेंबर सन १८९१ इ० — अंक ३७


वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ४ शके १८१३

अलिशान रेसिडेंट सर डेनिस फिट्झप्याट्रिक यांची बढती पंजाबच्या लेफ्टनंट गव्हर्नरच्या जागीं झाल्या प्रमाणें त्या नव्या हुद्यावर दाखल होण्या पूर्वीं साहेब मजकूर आक्टोबर अखेर पासून सहा महिने रजेवर जाणार आहेत. आणि दीड महिन्याभरांत ती रजा सुरू होतांच आमचे वऱ्हाडचे कमिशनर डोडन साहेब आपला कमिशनरचा चार्ज देऊन हैदराबादेस आफिशिएटिंग रेसिडेन्टचें काम करण्यास रवाना होतील; व सर डेनिस फिटझप्याट्रिक साहेब यांस सहा महिन्यांच्या रजेवर व नंतर नवीन अधिकारावर जाण्यास मोकळें करितील असेंही ठरलें आहे.

सर डेनिस मध्य प्रांतांतून आसामास, व आसामाहून हैदराबादेस बदलले होते आणि आतां ते हैदराबादेहून पंजाबांत जाणार आहेत. हे गृहस्थ विद्वान, अनुभवी व मुत्सद्दी पहिल्या प्रतीचे असल्या कारणानें यांची कारकीर्द सर्व ठिकाणीं लोकांस चांगली वाटली व वऱ्हाड प्रांतांत व निजाम सरकारांत ते लोकप्रिय असल्यामुळें त्यास सर्वजण चाहतात. वऱ्हाडांत साहेब आठ महिन्या पूर्वीं फिरले त्या वेळीं त्यांच्या स्वभावाचें सौजन्य, व्यवहारदक्षता, व कृपाळुपणानें लहान थोरांशीं वर्तन पाहून लोक त्यांचे गुण गात असतात. त्याच प्रमाणें ब्रिटिश सरकारचा निजाम सरकारशीं संबंध स्नेहभावानें दृढ होत चालला असून हैदराबाद संस्थानची भरभराट होत आहे हें रेसिडेंट साहेबांस श्रेयस्कर आहे. तेव्हां असे लोकप्रिय वृद्ध अंमलदार आपणांस सोडून जाणार आहेत हें आपल्या मनास रुचणार नाहीं तरी त्यांची बढती होणें, त्यांचा अधिकार वाढणें, त्यांचें वैभव विकासास पोंचणें, व त्याच्या सद्गुणांचा अमोल्य उपयोग आपल्या पेक्षां मोठ्या जनसमुदास होणें या गोष्टि आम्हांस फार आवडतात. तेव्हां वियोगापासून होणारें आपलें अस्वास्थ्य त्यांच्या उन्नतीनें आम्ही मोठ्या आनंदानें विसरूं.

मि. टी. सी. डोडन साहेब आफिशिएटिंग रेसिडेंट होणार आहेत ही गोष्ट वरील प्रमाणेंच आनंदाची आहे. कमिशनरच्या अधिकारावरून जोन्स साहेब थेट रेसिडेन्ट नेमिले गेले आणि त्यांच्या मागून डोडन साहेब हे दुसरे गृहस्थ कमिशनरच्या अधिकारावरून हैदराबादेस रेसिडेन्ट नेमिले जात आहेत. ड्पोडन साहेब चतुर, व धुरंधर व सद्विवेकी आहेत त्या प्रमाणें निष्णात पंडित असून फार मेहनती व कामें चोख व सरळ रीतीनें करणारे आहेत आणि त्यांचा आज तागाईत आमच्या लोकांना अनुभव आला आहे त्यावरून त्यांचा अंमल फार पद्धतशीर व जोरदार रीतीचा असल्या कारणानें व सत्यप्रियता व न्यायसमता या उभय गुणांनीं त्यांची कारकीर्द वऱ्हाडास चांगली लाभली व त्यांच्या दक्षतेच्या व्यवस्थेखालीं सर्व खात्यास सुधारणेचें वळण उत्तम लागलें आहे. परंतु ते मोठ्या बढतीच्या व अधिक लोकोपयुक्त अशा स्थळीं जाणार आहेत व हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीच्या संस्थानांत इंग्रज सरकारचे वकील ह्मणून जाणार आहेत. अशा समयीं आह्मी साहेबांस थोडासा अप्रिय बुद्धिवाद सांगितला तर ते रागावतील असें वाटत नाहीं; किंबहुना ते आमच्या ह्मणण्याची सत्यता शोधून पहातील. साहेब काश्मिरास रेसिडेन्ट होते त्या वेळीं त्यांच्या वर्तनासंबंधानें लोकांचे आक्षेप निघाले होते आणि त्याचें कारण आमच्या मतें साहेबांस दुसऱ्याचे दोष पतकरत नाहींत इतकेंच नाहीं तर दुसऱ्यास सन्मार्गाला लावतांना त्यांची व्यवस्था फार कडक असते. मनुष्य स्वभाव निर्दोष नाहीं आणि त्याच्या कमीपणाची भरती फार सौम्य रीतीनें व ज्यांस आपण सुधारणार आहों त्यांस आवडेल अशा तऱ्हेनें झाली पाहिजे. अव्यवस्था व मोंगलाई हैदराबादेस त्याच्या मागील नांव लौकिकाप्रमाणें थोडी बहुत असलीच पाहिजे. तर साहेबांनीं क्षमा व शांति या दोन गुणांची आपल्या स्वभावाला जोडगोळी दिली तर आमची खात्री आहे, कीं, कांहीं वर्षांनीं ड्पोडन साहेबां सारखा दुसरा उत्कृष्ट अधिकारी मिळणें विरळा असें आम्ही सर्वतोमुखीं ऐकूं. वऱ्हाडाशीं साहेबांचा संबंध कायम आहे तेव्हां आम्ही त्या विषयीं फार सुखी व आनंदी आहों.

---

## आम्हीं असेंच नव्हतों.

---

( ३३ वे अं. पु. चा. )

अलीगडास म्याजिस्ट्रेट असतांना माझ्या देखरेखीखालीं तेथील तुरुंग असे, त्यावेळीं तेथील जेलर रामपूर पठाण याशीं माझी चांगली ओळख झाली. तो मोठा पहिलवान असे व आपल्या कामांत हुषार असे. मीं वेळीं अवेळीं तेथें जावें परंतु तेथील व्यवस्था व टापटीप सदोदित सारखी असे. तेथें जे कैदी लवकर सुटणार व पुष्कळ वर्षें तेथें घालवून मुदत संपलेले असे असत त्यांच्याशीं मीं स्नेह जोडिला व सुटका झाल्यावर मला भेटण्याविषयीं त्यांस सांगितलें. ह्या तुरुंगांत पुष्कळ सभ्य गृहस्थही होते त्यांच्या सांगण्या वरून त्या जेलरची वागणूक त्यांच्याशीं सुद्धां फार योग्य असे असें मला दिसून आलें व त्यामुळें मला तो फारच आवडूं लागला व आमचा स्नेह वृद्धिंगत होत चालला. आणि ह्मणून मईनपुरी आणि दिल्ली याच्या दरम्यान टपालाचे टांगे लुटणारांना पकडण्याच्या कामीं माझी नेमणूक झाली तेव्हां ह्या जेलरला मी आपल्या गुप्त पोलिसचा मुख्य कामदार नेमण्याची परवानगी मिळविली व त्यास बरोबर घेऊन खुरजा येथील मुशाफर बंगल्यांत आह्मी उतरलों नंतर थोडक्याच दिवसांत, अलीगडच्या तुरुंगांतील कैदी माझे गुप्त पोलिस असल्या कारणानें व माझ्या मित्रास देवा प्रमाणें त्यांच्या कडून मान मिळत असल्यानें, आमच्या मेहनतीनें सर्व लुटारुंचा मोड झाला, चोरीस गेलेला माल बहुतेक मिळाला व कांहीं प्रमुख लोकांना शिक्षा झाल्या. ह्या बद्दल माझ्या मित्रास बक्षिस दाखल दिवाणी खात्यांत जागा दिली व नंतर बंडाच्या वेळीं सामळीस तो तहसिलदार होता. ह्या वेळीं मी त्यास मागची आठवण देऊन निमकहरामी न करण्या बद्दल लिहिलें व त्या प्रमाणें त्यानें आपलें वर्तन ठेविलें. माझा त्याच्याशीं दररोज पत्रव्यवहार सुरू असे परंतु त्याचें पत्र मला न पोंहोंचतां मध्येंच गहाळ होत असे. कांहीं दिवस लोटल्यावर त्याचीं सर्व पत्रें मला एकदम मिळालीं त्यां पैकीं एकावर खालील अक्षरें लिहिलेलीं होतीं.' साहेबांस बहोत बहोत सलाम. मी विश्वास घातकी व कृतघ्न होणार नाहीं. माझें कर्तव्य मी करीत आहे. पुढें ईश्वर समर्थ आहेच.' तेथें अशी गोष्ट घडली कीं, बंडवाल्याच्या टोळ्यांनीं त्याच्या कचेरीवर हल्ला केला व तिचें संरक्षण त्याच्यानें होईल तितक्या व्यवस्थेनें त्यानें केलें व रामपूरच्या कांहीं विश्वासु पठणास त्यानें मदतीसही बोलाविलें व दोन तीन खेपेस त्यानें बंडवाल्यास मागेंही परतविलें. परंतु ही बातमी दिल्लीतील बंडवाल्यास समजून त्यांनीं पुष्कळ लोक ह्याच्यावर पाठविले. ते त्या जागेस वेढा देऊन माझ्या मित्रास शरण येण्यास सांगूं लागले. ह्या बंडवाल्यांत तिसऱ्या पलटणींतील मुसलमान होते व ते ह्याला ओळखीत असत. त्यांच्या मनांतून ह्याचें संरक्षण करण्याचें होतें ह्मणून त्यांनीं त्यास पुष्कळ समजावणीच्या गोष्टि सांगितल्या व इंग्रजांचें राज्य आतां गेलें व त्यांच्या नांवावर तहसिलीचें काम न चालवितां दिल्लीच्या राजाच्या नांवावर चालवावें असेंही त्यास सांगितलें व दिल्लीस मोठ्या बढतीची जागा मिळेल असें अश्वासन दिलें व त्याच्या लवाजम्या सकट व सामानासकट त्यास त्याच्या घरीं रामपुरास सुरक्षित नेऊन घालविण्याचे अभिवचनही दिलें. परंतु ह्या बहादरानें त्यास साफ जबाब दिला कीं, दुसऱ्या धन्याच्या ताब्यांत जाण्यापेक्षां अथवा शरण जाण्यापेक्षां मला मरण अधिक प्रिय आहे. शेवटीं त्या बंडवाल्यांनीं त्या कचेरीवर हल्ला करून दरवाजे फोडून उघडले व दरवाज्यांत च त्यांच्याशीं लढतां लढतां माझा मित्र आपल्या सोयऱ्या धायऱ्या बरोबर मारला गेला व त्या प्रमाणें त्याचे चपराशीही त्याच्या बरोबर प्राणास मुकले त्यांच्या पैकीं कांहींजण मात्र बचावले व त्यांच्या कडूनच ही वरील बातमी समजली. ह्या माझ्या मित्रापेक्षां अधिक शौर्यानें कोणत्या इंग्रजास अशा प्रसंगीं वागतां आलें असेल हें मला तरी समजत नाहीं. हा माझा मित्र आपण स्वतः आपल्या कर्तव्यास विसरला नाहीं, इतकेंच नव्हे तर चपराशा सारख्या हलक्या लोकांसही आपणाप्रमाणें वागविण्यास ज्यानें लाविलें त्याची योग्यता वर्णन करावी तितकी थोडीच आहे.

" वरील कत्तलीची बातमी जेव्हां मुजफरनगरास कलेक्टर साहेबांस कळविली, तेव्हां ती स्वारी घाबरून गेली व काळोख पडतांच आपल्या बगींत बसून मिरतेकडे पळून गेली. परंत त्यांच्या चाकर लोकांनीं ही बातमी तावडतोब त्यांच्या शिरस्तेदारास व तहसिलदारास कळविली. ते दोघेही शूर असत. त्यांनीं खुद-साहेबांची स्वारी पळून गेल्याची बातमी बंडवाल्यांस समतांच एका रात्रींत सर्व शहरांत गोंधळ उडून जाईल, असें लक्षांत आणून-त्या साहेबांस वाटेंत पकडून माघारें आणिलें व त्यानें पुनः न पळून जावें अशी व्यवस्था केली. व त्याच्या नांवच्या अभयदर्शक जाहिराती प्रसिद्ध केल्या. व शाहरणपूरच्या कलेक्टरास सर्व हकिकत कळवून दुसरा एखादा हुशार कामगार पाठविण्या विषयीं विनंती केली व तो येईपर्यंत मोठ्या चातुर्यानें सर्व व्यवस्था ठेविली. दुसरा कामगार आल्यावर वरील साहेब बहादूरांची मिरतेस रवानगी करून दिली व तेथून तावडतोब त्यांस बोटींतून विलायतेस रवाना करून दिलें. हे साहेब पुनः परत आलेच नाहींत. वरील गोष्टी वरून एवढें सिद्ध होतें कीं, संकट समयीं नेटिव अथवा हिंदु लोक पराङ्मुख होतात व इंग्रज लोक अशा वेळीं सदोदित हातांत शिरकमल घेऊन तयार असतात असें समजणें चुकीचें होणार आहे.

" दुसऱ्या इंग्रज लोकांपेक्षां मला हिंदुस्थाना संबंधानें योग्य विधान ठरविण्यास पुष्कळ अधिक हक्क आहे. व मी खात्रीनें असें ह्मणतों कीं हिंदु व इंग्रज ह्यांच्या मध्यें फरक फार थोडा आहे. काळे गोरेपणा व जरी एकाच जातीचे तरी वेगळे होऊन हजारों वर्षें लोटल्या कारणानें चाली रीतींत व विचार सरणींत जो कांहीं थोडा फेरफार झाला

आहे तेवढा वजा केल्यास बाकी सर्व एकच आहे. सद्गुण अथवा दुर्गुण ह्या दोहोंतही दोन्ही जातींचे पाऊल दुसऱ्या कोणत्याही जातीपेक्षां पुढें आहे. दोन्ही जातीं निःपक्षपातानें ताडून पाहिल्या व कांहीं किरकोळ फरक दोन्ही बाजूचे एकिकडेस ठेवले तर अमुक एक जातीचे लोक अधिक चांगले हें सांगण्याची मारामारच पडेल. सुशील व थोर अशा एखाद्या हिंदूशीं जर एखाद्या हलकट व मूर्ख अशा इंग्रजांची तुलना कराल तर मनुष्य आणि माकड ह्यांच्यांतील फरक येथें दृष्टीस पडणार आहे. त्याच प्रमाणें दुसऱ्या पक्षाची गोष्ट. परंतु जर न्यायानें दोघांतीलही उत्तमाची तुलना कराल तर एकांतील कांहीं गुण दुसऱ्यांत व दुसऱ्यांतील दोष पहिल्यांत जरी कदाचित् दिसणार नाहींत, तरी अमुक एक दुसऱ्याहून चांगला असें सांगण्यास जड जाणार आहे. पंचवीस कोटी प्रजेंत सर्वजण चांगलें आहेत असें माझें म्हणणें मुळींच नाहीं. आणि जे वाईट आहेत त्यांत युरोपियनांची हांजी हांजी करणारांची संख्या फार आहे. व त्यांच्या वर्तना वरून च आह्मी लोक एकंदर सर्व देशाचा स्वभाव ठरविण्याचा प्रयत्न करितों ही आमची चूक आहे. शिवाय मी असेंही विचारतों कीं, ह्या पंचवीस कोटी प्रमाणें आमच्या तीन कोटी इंग्रजांत अशा दुर्व्यसनी लोकांची संख्या कितीशी कमी आहे?

"हिंदु लोकांबद्दल आमचा वाईट ग्रह होण्याचें कारण हें मुख्य आहे कीं, नेहमीं उलट बाजू घेऊन आह्मी हिंदु लोकांचा विचार करीत असतों व आमचे वाईट असें आह्मांस मुळींच दिसत नाहीं. व त्यांच्यांतील अति वाईट व आमच्यांतील अति उत्तम ह्या दोहोंची तुलना करण्यास आह्मी सदोदित तत्पर असतों आणि ह्मणूनच दोघांसही घातुक असें आमचें मत त्यांच्या विषयीं ठरलें जातें.

जर आह्मी इंग्रज लोक जातीचा व वर्गाचा भेद न मानतां निःपक्षपातानें दोनही जाती एकच आहेत असा मनाचा दृढ निश्चय ठेवून त्या प्रमाणें वागूं तर हिंदूस मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या पासून अनर्थ उद्भवतील असा जो आमचा चुकीचा समज झाला आहे तो नाहींसा होणार आहे व आमच्यांतील मोठमोठे गृहस्थ ह्या जरूरीच्या सुधारणेंस जे हल्लीं आडथळा आणीत आहेत चने लोक मनापासून सहाय्य करणार आहेत. कोणी अशीही शंका घेतील कीं, सर्व इंग्रजांचे मताविरुद्ध मी कां आहे. परंतु त्यांस माझें इतकेंच उत्तर आहे कीं, हिंदूविषयीं सर्व गोऱ्यांपेक्षां मला अधिक माहिती आहे. व नोकरीस राजीनामा दिल्यापासून मी सर्व हिंदुस्थानभर फिरण्याचा क्रम ठेविला आहे व सर्व प्रांतांतून मोठमोठ्या गृहस्थांची भेट घेण्याचा माझा सांप्रदाय आहे ह्याची साक्ष वाटेल तो पटवील.

"मी आपल्या बांधवांच्या व त्याच प्रमाणें हिंदूच्या कल्याणा खातर जे कांहीं चार शब्द कळकळपूर्वक सांगत आहे त्यांचा विचार माझे बांधव करोत वा न करोत. व मला वेडा ठरवून माझा तिरस्कारही करोत. माझ्या दोनही देशबांधवा संबधानें माझें जें कर्तव्य आहे तें मला बजाविलें पाहिजे.

कोणी कांहीं ही ह्मणो माझें माझ्या बांधवांस इतकेंच सांगणें आहे कीं, माझा आतां वृद्धापकाळ झाला आहे, मला कांहीं मिळण्याची आशा नाहीं व मला कांहीं नकोही आहे फक्त माझ्या सर्व जातीच्या बांधवांचे कल्याण व्हावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. व तसें कांहीं तरी जर माझ्या हातून होईल तर मला समाधान होऊन शांततेनें मरण काळची वाट पहात बसेन. माझ्या सांगण्याची माझे बांधव परवा करोत किंवा न करोत त्यांनां इतकेंच तरी कबूल केलें पाहिजे कीं, हिंदु लोकांच्या शौर्याबद्दल, औदार्याबद्दल व राजकारस्थानाबद्दल जो मला अनुभव आला आहे त्या अनुभवावरून त्यांच्या गुणांचे चीज होण्यास जर अडथळे येत असतील तर ते दूर करण्या बद्दल व दुसऱ्यांची समजूत घालून देऊन मला अनुभवास आलेला खरा प्रकार उघड करून दाखविण्याची जर मीं माझ्यानें होईल तशी खटपट करणार नाहीं तर मी इंग्रजी बीजाचाच नाहीं असें होणार आहे."

---

## भागवत.

(लि. आ. म.)

पुराणान्तरीं अशी कथा सांगतात कीं परिक्षिति राजा सर्पदंशानें ऋषिशापापासून सातवे दिवशीं भाद्रपद पौर्णिमेस स्वर्गस्थ झाला त्यावेळीं त्यानें त्या स्वल्प कालांत आपल्या देहावसाना पूर्वीं त्रिकालज्ञ शुकाचार्यांच्या प्रसादानें भागवत संपूर्ण श्रवण करून दिव्य लोक प्राप्ति घेतली तेव्हां भागवत हा महाग्रंथ ह्मणजे भवसागराला तरणोपाय आहे असा भाविक लोकांचा पक्का ग्रह वरील गोष्टीमुळें झाला आहे आणि भाद्रपदांतील या तिथीस भागवताचें पारायण संपूर्ण केल्यास लोक विशेष श्रेयस्कर मानतात. आपापल्यासाठींही स्वर्गाचे दरवाजे खुले व्हावेत ह्मणून आमच्या अकोल्यास सालाबाद प्रमाणें लोकांनीं येथील राजेश्वराच्या देवळांत व कचित् कचित् अवान्तरस्थळीं भागवताचा सप्ता केला. पुराणिकांचा बहुश्रुतपणा, वेदव्यासंग, बहुसाळ कथनश्रम इत्यादि लक्ष्यांत आणून आचार्यांची व त्यांच्या जवळील भागवत ग्रंथाची धनधान्यादि षोडशोपचारें यथाशक्ति भक्तिवंत, श्रद्धाळु व धर्मनिष्ट स्त्री पुरुषांनीं किंबहुना भोळ्या पुरुषानीं व संसारोद्विग्न बायाबापड्यांनीं पुजा केली व समाप्तीच्या दिवशीं ईश्वराच्या घरीं आपलें तुळशीपत्र रुजूं व्हावें अशा खऱ्या सात्विक भक्तिमार्गानें हस्तें परहस्तें बिदागी मिळवून देऊन या शहराच्या भक्तमंडळींनीं सप्ता यथासांग संपूर्णतेस पोचविला.

इत्यर्थ काय कीं सर्व दुनिया आपापल्या समजाप्रमाणें उन्नतावस्थेप्रत पोचण्यासाठीं नानाविध प्रकारें झुकत आहे ती इतकी कीं इहलोकींचा सुद्धां विचार एकीकडे ठेवून लोक अनिश्चित, अगोचर, अदृष्टपूर्व अशा परलोकाच्या ऐश्वर्यासाठींही आंधळ्या प्रमाणें गतानुगतिक आहेत. हें वर्तन सदोष असेल तरी हाही सिद्धान्त खरा आहे कीं तें सर्वथैव निर्दोष करणें मनुष्यप्राण्यास साध्य नाहीं मनुष्यवर्ग कल्पना बाहुल्यानें व्यापला आहे ह्मणजे मनुष्य अनादिकाला पासून कांहीं तरी कल्पना सृष्टीच्या प्रत्यक्षपणा साठीं प्रयत्न करीत असतो. नैसर्गिक गुण संपत्तीनें, बुद्धिवैभवानें, व मनोविकासानें संस्कृत अशा धुरीण जनांनीं सर्व सृष्टीचा ज्ञानौघ व भवितव्यता लक्ष्यांत आणून महान महान् विचार व कल्पना लोकसमुहापुढें प्रगमनासाठीं दाखवून दिल्या आणि त्याच्याच अनुसंधानानें जनसमूह वाहवत चालला आहे.

या वरून हें दिसून येईल कीं लोकांस धर्माव्यातीरिक्त आयुष्यमोल दुसरी वस्तु नाहीं तेव्हां त्या धर्मबुद्धीनें मनुष्य आपल्या ज्ञान सामर्थ्या प्रमाणें धार्मिक राहील. गेल्या भागवताच्या सप्त्यास कोणता जनसमूह गोळा होत असे हें लक्ष्यांत आणलें ह्मणजे असें वाटेल कीं ज्यांची ज्या प्रमाणें भागवताच्या धर्मग्रंथावर श्रद्धा होती त्या प्रमाणें ते ते लोक श्रोते समान लहान मोठा करीत असत गेल्या गणेश चतुर्थीस पुण्यास रावबहादुर रानडे यांनीं सांगितल्या प्रमाणें हिंदुलोकांच्या आंगीं धर्मबुद्धि सर्व जगापेक्षां फार जुन्या काळापासून जागृत आहे, ती धर्मबुद्धि साठीनाठी झाली ह्मणा किंवा भोंकरें जाऊन भोंकें राहण्या प्रमाणें तिचें नाममात्रें अस्तित्व राहिलें ह्मणा; लोकांच्या धर्मबुद्धींत ईश्वरविषयक गोष्टींचा लोप होऊन त्या स्थळीं आचार विषयक गोष्टींचें देव्हारें माजलें आहे. वास्तविक तंत्ररूपानें आचार विषयांत अस्तास गेला आहे त्यास उदयास आणा असें लोकांस सांगण्याचा सध्यां काळ आहे. जुना धर्माचा किल्ला ढासळावा व जमीनदोस्त व्हावा व नवान वैभवाप्रमाणें बांधावा अशा इच्छेनें वागणें ह्मणजे पूर्वसंचित सर्व कल्याणराशीवर पाणी सोडण्याप्रमाणें आहे तेव्हां लोकांस चुकल्या किंवा बुजलेल्या धर्म वाटांनीं याप्रमाणें चालूं देतां देतां त्यास सन्मार्गाची किंवा पूर्ववाटांची नीट ओळख करून देणें श्रेयस्कर होईल.

---

लोकांनीं भाकित केल्या प्रमाणें मणिपूरच्या गादीवर राजा नरसिंग यांच्या पणतू पैकीं एका पांच वर्षांच्या चारुचंद्र नांवाच्या मुलास बसविण्याचे सरकारनें ठरविलें आहे. सध्यांच्या बडोदे महाराजा प्रमाणें गादीवर हक्क पोंचत नाहीं अशा अल्पवयस्क बाळाची योजना केली व त्यास 'राजा' हा किताब देऊन गादीचा वारसा ज्येष्ठ पुत्रत्वाच्या नियमानें पाळला जाईल आणि तो नियम संतानाभावानें चालला नाहीं तर भाऊबंदांतील वारसदार शोधला जाईल असें कायम ठरलें. मणिपूरचा खरा राजा ह्मणजे इंग्रजी अंमलदार मेजर म्याक्सवेल्स साहेब हे होत. एकंदरीनें मणिपूर संस्थान खालसा केलें किंवा न केलें तात्पर्य ह्मणून एकच!

# The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 21, 1891

We take up first the report on Civil Justice in Berar for 1890. Though it came late to us as far as 18th ultimo we meant to make up the time by reviewing it earlier. But a summary perusal of the report undeceived us in respect to our confidence in getting through it so sharp. The report unlike its predecessors, is indeed 'full and interesting.' It starts with a warning to the Deputy Commissioners that they should *themselves* prepare and review the annual statements. By shirking their duty to other shoulders they evade the main object of an annual report and remain in bliss of ignorance in regard to the 'condition of their charges.' The Judicial Commissioner observes specially an absence of method in the supervision of Mr. Nicholetts and unpalatably dwells on the wrong returns of Mr. Yassinkhan.

There are in Berar 42 tribunals from the Judicial Commissioner to the Naib Tahsildar. The average number of suits for the last five years is 25793 and that of the year of the report falls short by 39 cases. With respect to the weight of litigation appears no special change though there were local functions owing to new civil courts, the uncertain harvest of work of some of the old ones, and the alarming effects of influenza.

The suits instituted under 'money & moveables' were 22321 and those which pertain to the land were 3433. The total suits of the first class have diminished by 2 p. c. while that deficit is made up mainly under suits of the second class. The Judicial Commissioner suggests that agricultural prosperity was the probable cause of the rise and fall noted above. He thus put it:— Possessing more money, debts are more readily paid, leading to a fall in suits on contracts either written or verbal, while an appreciation in the value of land has naturally stimulated litigation in respect of land.' It is but natural that where people are more or less 'jungly' there must be a high percentage of contracts not in writing.

Though it is not given to every one to forecast intelligently the drift of passing events it is certainly not denied to Colonel Mackenzie who philosophises on the general condition of the peasantry in Berar. His object is to dispel popular beliefs as vague and unwarranted. It is a national cry that the Indian agriculturist is sinking in the depths of poverty and starvation. Berar is purely agricultured and the echo of the cry is rather alarming. Our provincial Aristides marshals his arguments to falsify the popular belief. The style is rather racy and vigorous and lends a peculiar charms to the subject. This portion in his report is worth ten thousand repetitions for it savours more of an official recognition of the all-important topic of the day. It signalizes a danger in the people's talk but rejects it as unwarranted by experience. To our mind such an opinion as coming from the grand authority quells further inquiry though we are fully conscious that Colonel Mackenzie will not rest himself satisfied with the explanation that he has been able to advance to the acceptance of the people. Had we not known who the writer is we would have rushed in print to argue adversely. We are too familiar with the general belief of deterioration in the status of our agricultural classes. We have published, often times, what people have talked and we have thought with them. Though one be not convinced with these optimistic views of an officer whose high rank and vast experience entitle him to public estimation as a standard authority he should have the choice of suggesting what apprehensions and contrary tenets work in his mind as to the facts that pass before his eyes. We would claim such a right after we reproduce *in toto* the learned opinion from the report on hand:—

"In a province whose main reliance is agriculture, the real condition of its agriculturists is of primary interest

The general idea is that in Berar, as in other parts of India, we are in this respect slowly going from bad to worse, that the great body of the cultivating class is steeped in debt and year by year is sinking deeper into debt, and that individually the members of this class are becoming bondsmen to the Marwari or the money-lending class. The one side is generally represented as child-like in its innocence, falling an easy prey to the fiendishly-acute and vampire like instincts of the other, with the result that the ownership of the land is said to be rapidly changing hands from the one to the other, bringing con sequences in its train disastrous to the peace of Government and calling for ear ly attention and interference. Portions of certain of the district reports illustrate this. It is very difficult to get at a sufficiency of facts on which to found safe ly a belief. I believe, however, that in Berar at least the condition of the peasantry is better now than it has ever been, that there is a deal of indignation wasted and sympathy misplaced when the relations of the creditor and debtor class are discussed— that is, on the average both are pretty much on a par in cuteness and in the ability to look after number one, and that in the struggle to get the best of a bargain when they come to deal it is really a case of "diamond cut diamond." If the Marwari—I use the name as typical of the money-lender— is hard and pitiless, it is because virtually he is driven— the result of long practical experience— to protect himself against the cunning and unscrupulous tortuosity of the kunbi, the borrower, when it suits the kunbi, as unfortunately it too frequently does to be unscrupulous.

It is supposed by those best informed that quite one third of the land in Berar has passed to the money-lender, but if so, no one that I have been able to find— and I am always seeking information as opportunity offers from those likely to know— can point to any facts *indubitably* indicating that harm has followed this transfer. Part of the notion that there must be harm appears to be founded on the idea that the money-lending class, as the name Marwari imports, is *entirely* foreign and persistently carries its gains out of the country. Of these two sumptions the first is incorrect and the second is doubtful, for the lending class is certainly largely composed of kunbis themselves, the indigenous cultivating class grown to affluence, while there is nothing to show that those of the money-lenders, who are foreigners from Rajputana chiefly, remove, except insignificantly, their capital from Berar.

When we took over Berar a large portion of the land was wholly uncultivated. In those smaller portions on which man had settled, cultivated land as such had no marketable value whatever, and the actual cultivating class had to be induced and kept in by all manner of devices and was protected by those interested in the land. They were poorly and scantily clothed; they could afford themselves no ornaments and no luxuries, and were often indeed so poor that they could not afford them selves even earthenware vessels to eat off, but used the leaves of trees as plates for their food. I was myself a witness to this state of things in the early days of our administration. How entirely different at all points can the picture now be painted. And if this is so, I for one think that the more reasonable de duction to be drawn is that, whatever evils advancing comfort and so-called civilization is bringing in its train un known to days of old— and every change of condition usually brings some evils of its own— it cannot as yet at least be truthfully asserted that our agricultural class as a class has deteri orated and is in worse case than it was. The very fact that over and above those calls of Government in the shape of taxation of sorts, to which they must submit, our people can afford to and do litigate, almost joyously and often recklessly, bespeaks money, and money means well-being.

To the allegation that usury is rampant and crushing, I would answer that interest is high partly because the great mass of the people hoard or tie up in jewelry their wealth instead of putting it into circulation, partly because the security tendered for loans is practically bad. And from the knowledge that has come to me in cases that I have tried, I suspect that, if we could but impound every money-lender's books and have a reliable examination of the made, we should discover that the real interest enjoyed by them on their money put out is much lower than is popularly and generally believed.

There is another fact of importance often I think lost sight of, namely, that those descendants of our tenantry who still hold land acquired in Moglai times hold a thing that was gifted to their ancesters when it was of little or no value and has since enormously appreciated in value. Now, when by stress of circumstances, for which they may or they may not individually deserve sympathy, though reckless improvidence is often at the bottom of their griefs, any of these people have to part with their land, the land, to its new holder, be it the Marwari or the cultivator to whom he re-sells it, has to provide as a first charge the interest of the debt to clear which its sale was necessi tated *plus* the Government assessment before it can be said truly to pay. It fol lows that in those cases in which the ori ginal holders are not actually divorced from their holdings, but only have their status changed, and from being so called proprietors subside, as they often do, into being the money lender's tenants or even, if they go elsewhere and lease land simi larly burdened, they actually and at once feel the difference in the returning value, so to speak, of their holdings. The feel ings engendered by this impoverishment go a long way to supply something to the bitterness by which the money lender as a class is often so unreasoningly condemn ed. But the result is inevitable if there is to be a money lending class at all entitled to change and take interest, however little. In fine I conclude that we do not know enough yet to decide if any of the interfer ence suggested is desirable or, if desirable, whether we have the prospect of making it efficiently. What has resulted in the Deccan through legislative interference is not, I think, encouraging.

( To be continued )

## वऱ्हाड.

हवामान — या आठवड्यांत दोन दिवसांतच पाऊस चांगला पडला आणि तो ही पिकाच्या संबंधानें ऐन वेळेवर पडल्यामुळें लोकांस विशेष आनंद वाटतो. रोगव्याधींचा उपद्रव नेहमींपेक्षां प्रबल असल्या विषयीं ऐकिवांत नाहीं.

मि. जे. ए. क्राफर्ड पोलिटिकल एजंट व फर्स्ट असिटंट रेसिडेंट यांस गेल्या आठवे तारखे पासून चौदा दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली होती.

उमरावती धर्मार्थ दवाखान्यावरील डाक्टर डिसोझा यांस अकोला व खामगांव म्युनसिपालिटितल्या प्रमाणें दरमहा वीस रुपये मुनसिपल अलावन्स देण्याचा ठराव झाला. 'प्रमोदसिंधु' कर्ते त्यांच्या लोक प्रियतेबद्दल विशेष वाखाणणी करितात.

येत्या शनिवारीं उमरावती जिल्ह्याची पोट वतनदार सभा व्यवस्थापक मंडळी भरविणार आहेत प्रत्येक जिल्ह्यानिहाय अशा पोट सभा लवकर स्थापिल्या जातील तितकें बरें.

येथील हार्वे आणि सभापती कंपनीस चालू सालीं त्यांच्या भांडवलावर शेंकडा दहा प्रमाणें फायदा झाला. या कंपनीचीं चार ठिकाणें आहेत ती अकोला, उमरावती, अहमदनगर, व विजापूर ही शहरें होत. सालमजकूर एकंदरीनें या कंपनीनें ४०३३३ कापसाची गठडी बांधली.

येथील चिफकानस्टेबल मि. अब्दूल लतिफ हे वाशिमास बदलल्या कारणानें त्यांचे जागी रा. रा. रघुवीरसिंह दुनियासिंह हे गृहस्थ आले आहेत. हे चांगले सुशील व शिकलेले आहेत तेव्हां ते आपल्या वाडिला प्रमाणें पोलीस खात्यांत लवकरच उच्चस्थानाप्रत आपला दर्जा चढवून घेतील अशी आह्मांस उमेद आहे.

### नोटीस.

भगीरथदास नथमलसाहू दुकान खामगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं संवत १९४६ सालीं तुह्मी व आह्मी शिरीमध्यें रुईचा व्यापार मुंबईचा करून गाठ्या मुंबईस रवाना केल्या. त्याजमध्यें आमचे ऐन रु.५१४४-१२ शि, वाय व्याज असे अंदाज रु. ६००० सहा हजार निघत असून त्यांतील निमे हिशाचे रु. ३००० तीन हजार अदमासें तुमचेकडे येणें असून त्यांत तुमचे धरू खात्यांत रुपये १८०० आठराशें रुईचे तोट्या नफ्या करितां तारण ठेविलें ते जमा आहेत. ते वजा जातां राहिलेली अंदाजी रकम रु. १२०० बाराशें तुमचेकडे आमचे घेणें निघत आहे. ते रु. आठ दिवसांचे आंत देऊन चुकती पावती आमची घ्यावी. असें न केल्यास लागलींच तुह्मावर फिर्याद करून खर्चासुद्धां रु. व ह्या नोटिशीचा खर्च वगैरे अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस.

ता० २०—९—९१ इ०

( सही )

बिसनदयाल रामनारायण दस्तुर मंगलचंद दुकान खामगांव.

### नोटीस

बिसन दयाल सिवनारायण साहू दुकान खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं. संवत १९४६ सालीं तुम्ही, मी व चिमणीरामजी रामप्रताप असे तीघे मिळून रुईचा व्यापार करून त्यांत आमचा हिस्सा साहा (-६) आणे व तुमचा हिसा साहा (-६) आणे व चिमणीराम रामप्रताप यांचा हिस्सा चार (-४) आणे असे हिस्से ठेविले. सदहू रोजगारास रक्कम व्याजानें आम्ही लावून सदहू रुईच्या गाठी मुंबईस पाठविल्या त्या गाठीचा निकाल होऊन अखेर शिरखात्यांत आमची रक्कम रुपये ४३२३ -७-६ त्रेचपाळीशे तेवीस सात आणे साहा पैई घेणे निघत असून या हिस्सेरसी प्रमाणें आमचेवर रुपये १६२१ -४ -९ सोळाशे येकविस पावणेपांच आणे व तुमचेवर १६२१ -४ -९ व चिमणीराम रामप्रताप याजवर १०८० -१४ आणे एकंदर रक्कम आमची घेणे आहे त्यांत चिमणीराम रामप्रताप तर्फे मिरजामलोंनें निकाल करून आम्हांस दस्तऐवज वगैरे करून दिला आहे व तुम्ही हा काल पर्यंत निकाल करीत नाहीं म्हणून या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुमच्या हिशा बद्दल रुपये शिवाय व्याज आज पावेतों रुपये अदमासे दोनशे २०० एकूण रुपये १८२१ -४ -९ येणे त्यांत तुमचे खात्यांत रुपये तोट्या नफ्या करिता तारण ठेविलेली रक्कम रुपये १०५७ ती वजा जाता राहिलेली निवळ रक्कम तुमचे कडेस रुपये ७६४ -४ -९ निघाले ते नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत देऊन निकाल करून पावती घ्यावी असें केलें नाहींतर तुम्हांवर फिर्याद करून ह्या नोटिसीचे खरचा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जे नुकसान वगैर होईल तें सर्व भरून घेतलें जाईल म्हणून दिली नोटीस तारीख २० माहे सपटंबर १८९१ इ०

( सही ) बिसन दयाल रामनारायण दस्तुर मंगलचंद दुकान खामगांव.

### नोटीस

नोटीस राघोभट बिन बाळंभट राहणार पुसद जिल्हा वाशिम यांस खालीं सह्या करणार यांज कडून नोटिशिचे उत्तर देण्यांत येतें कीं तुम्हां वऱ्हाडसमाचारातून आम्हांस नोटीस दिली. त्यातील मजकूर भाऊबंदांचे संबंधानें सर्व लबाडीनें लिहिला आहे पुसद येथील जोसपण तुमचे आणि आमचे समाईक आहे व सालपाळी आहे. परंतु या वर्षांत आम्हीं तुमचे जोसपणाचे संबंधानें मुळींच कोठें जात नाहीं. गावांतील कोमटी मंडळी तुम्हास ग्रामातील ग्रामण्याचे संबंधानें बोलावीत नाहींत. गावांत मूळ ग्रामण्य तुम्हींच उभें केलें आहे, तें असें कीं पुसद येथील कृष्णाजीपंत उंचेगावकर याची मुलगी विधवा सकू हिचा भ्रतार मरण पावून सात वर्षें झालीं तिजला गर्भधारणा होऊन कन्या उत्पन्न होवून ती चार महिने होती त्या दिवसेस गावचे धर्माधिकारी देशमुख देशपांडे यांनीं बहिष्कार दिला असें असतां आठ महिन्या नंतर तुम्ही तिजला अशास्त्र विधीनें शुद्धकेलें त्या संबंधांत शिरलें त्याजवरून तुमची आणि आमची भोजनपंक्ति वर्ज आहे त्या मुळें गांवातील कोमटी मंडळी तुमचें तीर्थ घेण्यास तुम्हांस बोलवीत नाहींत. हा सर्व प्रकार एकीकडेस ठेवून विनाकारण आम्हांस तुम्ही जोसपण करितां हें दूषण दिलें.

तुम्हास आमचे सालांत ज्या प्रमाणें कोणि बोलाविलें असतां तिर्थादिकास जाता त्या प्रमाणें आम्हांस कोणी बोलावूं अलितर आम्ही जातो हा तुमचा व आमचा भिक्षुकीय धर्म आहे त्या प्रमाणें हें वर्तन आहे. आम्हीं मुळींच तुमचे जोसपणाचे उत्पन्न कोणाचेंच घेतलें नाहीं घेतल्यास कोणा इसमा पासून किती उत्पन्न घेतलें हें शाबीत करावें हें तुम्ही आठ दिवसांचे आत शाबीत न केल्यास विनाकारण आम्हांस त्रास दिल्या बद्दल नोटिशीचा झालेला खर्च आठ दिवसांत आणून द्यावा न दिल्यास रीती प्रमाणें या सर्व खर्च सुद्धां घेतला जाईल कळावें

ता० १२-९—९१ इ० (सही )

१ खंडभट बिन रामभट जोशी पुसद दस्तुर खुद्द.

२ चंद्रभागा जवजे नागोभट पुसद दस्तुर देविदास नागेश.

३ सदाशिवभट जोशी पुसद. दस्तुर खुद्द.

४ तुकाराम बिन गनभट जोशी पुसद दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

आजपर्यंत हक्काची रजा वर्षांतून एकच वेळ मिळत असे. पण यापुढें रजा शिल्लक असेल तर सद्दा सहा महिन्यांनीं देखील हक्काची रजा द्यावी असा एक सरकारचा ठराव आल्याचें समजतें. प्रत्येक वेळेला एक महिन्यापेक्षां जास्त रजा मिळावयाची नाहीं, हें आहेच.

खांडव्याच्या पोष्ट आफिसांतून सेविंग ब्यांकेच्या खातेदाराला हिशेबासाठीं बूक हजर करण्याची नोटीस गेली, ती त्याला न मिळतां त्याचे नांवाच्या दुसऱ्या मनुष्यास मिळाली. ती घेऊन तो पोष्टांत गेला व मीच तो खातेदार, पण माझें बुक हरवलें असें सांगून त्यानें रुपया देऊन नवें बुक विकत घेतलें, व कांहीं नवी रक्कम ठेविली १-२ महिने लोटल्यावर त्यानें पोष्टांत जाऊन सर्व रकम काढून घेतली. थोडे दिवसांपूर्वी रुपयांचा खरा मालक आला व रुपये मागूं लागला तेव्हां सर्व पाप बाहेर आलें हें उदाहरण पाहून आपापल्या ठेवी संबंधीं लोकांनीं बरचेवर सावधगिरी ठेवावी.

क. त.

गेल्या सोमवारीं पाकणीचे अ. स्टेशन मास्तर रा. रा. श्रीधर महादेव हे नेहमीं प्रमाणें लाईन क्लीयर देण्यास गेले असतां पाऊस व वाऱ्याचें तुफान झाल्यामुळें पाय घसरून रुळावर पडल्यामुळें त्यांच्या आंगावर गाडी जाऊन त्यांच्या आंगाचे तुकडे तुकडे झाले.

सत्य शोधक वरून समजतें कीं, रत्नागिरी फर्स्ट क्लास सब जज्ज कोर्टांत एका पक्षकाराला अर्जावर नव्या ऐवजीं जुनें टिकिट लाविल्याचा संशय आल्यावरून त्यानें ती गोष्ट रा. ब. ठोसर स. ज्य. यांचे कानावर घातली. त्यानीं मोठ्या शिताफीनें तावड तोब त्याच कोर्टांतील कारकून राघो कृष्ण लिमये यांचा घरचा झाडा घेतला, तेव्हां त्यांचे बिऱ्हाडीं ६०० रु० चीं कागदावरून खोडून काढलेलीं जुनीं टिकिटें मिळालीं! सदर्हू आरोपीस पकडलें असून पुढील तपास सुरू आहे इकडे कोर्टांतील कारकुनांनीं लक्ष द्यावें.

विजेच्या यंत्रानें हजामत—अमेरिकेंत कांहीं लोक दाढी करण्यास विजेचा उपयोग करितात हनवटींत कांहीं अंतरावर दोन बारीक सुया टोंचून त्यांच्या द्वारें विजेचा प्रवाह चालू करतात व त्याच्या योगानें त्या सुयांमधील जागेंतील सर्व केंस मुळा सकट बाहेर उपटून पडतात.

९७ अंशा पासून १२७ अंशा पर्यंत उष्णता ज्यांत आहे अशा कढत पाण्यांत बसल्यानें कुत्रें चावलेल्या विषाची बाधा होत नाहीं व हा उपाय सर्पदंशावर ही आहे असे एकानें प्रसिद्ध केलें आहे. न्या० सिं०

रशियांत दुष्काळ फार पडला आहे या मुळें फार काळजी लागली आहे

कानपूरच्या बाजूला एक कालवा फुटून रस्त्यांत सारें पाणीच पाणी झालें व आगगाडीच्या रस्त्यावर अतिशय पाणी साचलें.

हैदराबादेकडे नुकताच चांगला पाऊस पडल्यामुळें दुष्काळाची भिति अगदीं नाहींशी झाली आहे.

मद्रास इलाख्यामध्यें हांगकांग व योकोहामा येथील बांबूची लागवड करण्याचा विचार चालला आहे व त्या साठीं पुष्कळ बीं आणविण्याची खटपट चालली आहे.

सु० प०

हावरा येथील रेल्वे स्टेशनावर गेल्याचे मागील आठव्ड्यांत पाटना येथून एक भली मोठी मालाची ह्मणून पेटी आली. त्या पेटीला चमत्कारिक घाण येत असल्यामुळें ती फोडून पाहिली, ती आंत एक २५—३० वर्षांचे उमरीच्या मुसलमाननीचे प्रेत दिसलें! ह्या भयंकर गोष्टीच्या तपासा साठीं पाटना येथें पोलिस गेलें आहे.

गोरा फकीरः—बंगाल्याकडे डाका शहरीं एक गोरा मनुष्य फकिराचा वेष घेऊन आला असून तो ह्मणतो कीं, मी अमेरिकेंतील रहिवासी आहे. तिकडच्या डोंगराळ प्रदेशांत पुष्कळ हिंदू असून ते महादेव, राम गौरी इत्यादि हिंदु देवतांस पुजतात.

लंडनचे प्रसिद्ध डाक्तर वुइलियम टेबे यानें आंकडे देऊन असें सिद्ध केलें आहे कीं देवी काढण्या पासून रक्तपितीचा रोग उत्पन्न होतो. कायद्यानें देवी काढण्याची युक्ति करणें म्हणजे दुसरा एक भयंकर रोग सुरू करण्यासारखें आहे, असेंही त्यांचें मत आहे. या डाक्तरानें आणखी असेंहि सिद्ध केलें आहे कीं, देवी काढण्याच्या रीती पासून गोवर व कांजण्या वगैरे जास्त होतात.

दि० बं०

चिनांत ख्रिस्तीलोकांवर जो शेवटचा दंगा झाला त्यांत दंगे खोरांनीं इंग्रज वकिलाच्या छावणीवर हल्ला करून तिची नासाडी केली असे ता. ९ ची तार सांगत्ये. या दंग्याच्या शांतत करतां दंग्याच्या बंदरात फ्रेंच गलबत जात आहे. या मिशनरींबद्दल चिनीलोकांचा कांहीं वेडी वाकडी समजूत झाली आहे. असें दिसतें; कापरतां लोकांच्या समजुतीची चूक दुरुस्त करण्याचा उपाय करावा हें चांगलें दिसतें. गनवोट गेली किंवा राजापासून नुकसानी घेतली तरी लोकांची समजूत सुधारण्याकरता कांहीं उपाय केला तर व मिशनरींनीं आपलें ठाणे चार दिवस बाहेर काढलें तर फायदेशीर होईल.

सिकंदराबाद येथें नळाचे पाणी सहा मैल लांबीवरून आणण्याचें काम चालूं आहे.

रशियानें आपली फार मोठी फौज वारसा येथें जमा करण्याचा हुकूम केला आहे.

पंजाब व वायव्य यांतील गव्हांचें बीयाणे रशियानें आपल्या राज्यांत लागवड करण्याकरतां नेलें आहे आमचे सुधारक तिकडचें एकादें बियाणें आणतात काय? स्त्री स्वातंत्र आणतोहत खरें.

कांहीं वर्षांनीं सर्व माणसें बिन दातांचीं होतील असें कांहीं डाक्टरांचें अनुमान आहे. ते ह्मणतात दातांच्या पोषणास हवे तसें अन्न मिळत नसून मनुष्यांचे मानसीक श्रम वाढल्यामुळें दातांच्या मजबुतीस कमीपणा येत आहे! तर मग सुधारणा वाईट ठरत्ये! खरें झाल्यास कृतीचे दांत बसविणाऱ्यांची चमन उडेल.

एका पक्षकाराच्या जुन्या कज्जा मधील जबान्यांत पुष्कळ ठिकाणी शोध घातलेले आढळल्यावरून त्या बद्दल तपासाचें काम हल्लीं रत्नागिरी येथील फ. क्ला. सब. जज्ज कोर्टांत चाललें आहे मामलेदार कचेरींतील एका जबानींत शोध घातल्याचा संशय उत्पन्न होऊन मूळ या प्रकर्णास आरंभ झाला व त्यावरून शोध लागतां लागतां रेकार्ड;सबजज्ज व जज्ज कोर्ट; डे.कलेक्कर वगैरे कचेऱ्यांत जेथें जेथें ह्या पक्षकारांची कामें होतीं त्यांतून बहुतेक. ठिकाणीं जबान्यांतून मुद्याचे ठिकाणीं फेरफार झालें आहेत असें समजण्यांत आलें आहे. हें खटलें कोठ पर्यंत जातें तें पाहावें! एकंदरींत कृत्य फार भयंकर दिसतें.

नियमित हिरा देण्याचे कबूल करून २३ लाख रुपये नेले व तो हिरा देत नसून रुपयेही देत नाहीं अशा बद्दल जेकब व्यापाऱ्यावर निजामानें कलकत्याच्या माजिस्ट्रेटा कडे जी फिर्याद केली यावरून जेकब यास कैद केलें व त्याच्या घराचा झाड ही घेतला. जामीन घेण्याच्या पुष्कळ खटपटी झाल्या, पण माजिस्त्रेटानें व हायकोर्टानेही जामीन घेण्याचे नाकरलें त्यावरून तो हल्लीं कैदेत आहे. निझामाची साक्ष कमिशन नेमून घ्यावी असें त्याचे ह्मणणं आहे. पुढें काय होते पाहावें.

रशियांत जरी आमचा सनमान झाला तरी रशियांस कांस्टांटीनोपल फ्रान्स घेऊं देणार नाहीं असें फ्रेंचपत्रें ह्मणतात.

गायकवाड हे १० रोजीं सोलापुरच्या युनियन क्लबांत गेले होते व मानपत्र घेऊन योग्य उत्तर दिलें. विजापुरास कां जातात?

तिघे मुसलमान व दोघे परदेशी पाच नेटिव पेन्शनर लश्करी कामदारांस सरकारानें पंजाबांत ६,००० रुपये किंमतीची जमिन चांगली कांम केल्याबद्दल दिली. चांगलें लोकांस उत्तेजन येण्यास हें चांगलें कारण.

गिलजित येथें सरकार जास्त फौज ठेवीत आहे.

कलकत्याच्या बड्या हिऱ्याचा खटला चालूं आहे. हा कोहिनूरपेक्षा दिढीनें मोठा आहे.

आसाम हद्दीवरच्या दांडगाई करणाऱ्या कांहीं रानटी लोकांवर येत्या हिवाळ्यांत हिंदुस्थानसरकारची एक लहानशी फौज जाणार आहे.

विलायतची निर्गत गेल्या आगष्ट महिन्यांत २,००,००,००० रुपयांनीं कमी झाली असें सांगतात हिंदुस्थानच्या लोकांनीं तितक्या रुपयांचा माल कमी खरेदी केला की काय?

ठा० अ०

दुधाचें झाड— सर्वच गोष्टींत अमेरिकेंत अपूर्व असावें असा परमेश्वरी संकेत आहे कीं काय कोणजाणे! दक्षिण अमेरिकेंतील खडका भागांत "गायझाड" म्हणून एक वृक्ष असतो. कारी आको शहरा नजीक व व्हेनेझुएलाचे समुद्र किनाऱ्यानें तर हीं झाडें रानोमाळ असतात. त्याच्या बुंधाचा घेर ६।८ फूट आणि उंची १०० फूट असते ६०।७० फूट पर्यंत त्यास पान अगर फांदी नसते. त्याचें पान एक फूट लांब ३।४ इंच रुंद असून त्याचा रंग गर्द हिरवा असतो. ह्या झाडांतून गाईच्या दुधा सारखें निरोगी व पौष्टिक दूध निघतें. गाईच्या दुधा प्रमाणें त्यास लोणीही निघतें. चमत्कार हा कीं मारक झाडाच्या वर्गी पैकीं हें एक झाड आहे. परमेश्वराच्या अद्भुत अनेक करामतीं पैकीं ही एक आहे असें कोण म्हणणार नाहीं. शु० सू०


HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठ्या पुतळ्या



खोटा माल घेऊन फसूं नका — खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तूवर G. B. N. अक्षरें पहा.

५०००० वर विकल्या

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगात शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला. व त्या पासून पुष्कळ अजारीं मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरी पासून बरे होतात. संधिवायू, शिरांगत वायू, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध, आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वां जवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु० ३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० ख्रर्च आणे. रोख दाम असल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धा आणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत. जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.

---

## भारी अजब दवा.

चष्मा लावूं नका.

हें रामबाण औषध फक्त २१ दिवसांत तीव्र दृष्टि करतें. तुह्मांस चष्मा लाविल्या शिवाय जवळचा किंवा दूरचा पदार्थ दिसत नसल्यास हें औषध घ्या. गुणाबद्दल अनेक दाखलें मिळालें आहेत. पूर्ण माहिती औषधा सोबत. किं. २ रु. बंगी खर्च ८६ व्हा. पे. पाठवूं. पत्ता— ग. स. पाटील. बुधवार पेठ पुणें.


---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ टांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

per annum in advance 5 Postage 13 a
Per annum in arrears 7 ,, 1Rs. 8 as
Six monthly...........3 " 6 as
Single copy.....................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXV AKOLA MONDAY 28 SEPTEMBER 1891 NO. 38

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २८ माहे सप्टेंबर सन १८९१ इ० अंक ३८



## भारी अजब दवा.

चष्मा लावूं नका.

हें रामबाण औषध फक्त २१ दिवसांत तीव्र दृष्टि करतें. तुह्मांस चष्मा लाविल्या शिवाय जवळचा किंवा दूरचा पदार्थ दिसत नसल्यास हें औषध घ्या. गुणाबद्दल अनेक दाखले मिळाले आहेत. पूर्ण माहिती औषधा सोबत. किं. २ रु. बंगी खर्च ०६ व्हा. पे. पाठवूं

पत्ता- ग. स. पाटील. बुधवार पेठ पुणें


## NOTICE

The following rules have been applied to the Charitable Dispensary Akola and will be brought into force from the 1st of October, 1891.

Tickets under Rule 8 will be issued by the Municipal office; and retail price of medicine under rule 6 will be received by the Medical Officer in charge of the Dispensary.

23rd September 1891 } V. R. Mudholkar Secretary M. C. Akola

Rules for payment of fees for medical attendance and medicine at Dispensaries in the Hyderabad Assigned Districts:—

1. Persons whose annual income is less than Rs. 300; and all Government servants are alone entitled to gratuitous relief at a dispensary which is wholly or in part maintained at the expense of Government.

2. Any person whose annual income is Rs. 300 or over, and is less than Rs 1000, will get a ticket entitling him to relief (for self and dependents) on payment of two rupees annually in advance.

3. Any person whose annu in-come is Rs. 1000, and is les than Rs. 5,000, will get a tick t similarly on payment of Rs. 6 annually in advance.

4. Any person whose annual income is Rs. 5,000 or over will get a ticket similarly on payment of Rs. 15 annually in advance.

5. Any person who presents a dispensary with a donation of not less than Rs. 100 and not exceeding Rs. 200 shall get a ticket entitling him to relief for self and dependents for ten years.

Any person who presents a dispensary with a donation of Rs 200 or over shall get a ticket entitling him and his dependents to medical relief for his life.

6. A person who is not entitled under rule 1 to gratuitous relief and who has not made the payment required by rules 2, 3 or 4, or who has not presented a donation under rule 5, must pay for any medicine dispensed to him at a dispensary such price as may be fixed from time to time by the Sanitary Commissioner. A list of the prices fixed by the Sanitary Commissioner will be hung up in every dispensary.

7. The local body entrusted with the management of a dispensary will prepare a list of persons not entitled to gratuitous relief under rule (1). the assessment of incomes prepared for the Town Fund being accepted for this purpose. A copy of this list will be furnished to the medical officer in charge, and it will be his duty to refuse gratuitous treatment or the gratuitous supply of medicine to any one not entitled to them under these rules.

8. Tickets will be issued under the orders of the local body concerned. The period for which a ticket is current and the names of the persons entitled to relief under it will be specified on it.

9. The local body concerned is responsible that all payment and subscriptions are collected and brought to account.

10. Holders of tickets will not ordinarily be entitled to treatment except on attendence personally at the dispensary, but medical officer in charge may use his discretion as to cases in which he considers it necessary to relax this rule.

11. Any person who is attended beyond the limits of the village in which the dispensary is situated shall pay Rs. 2 for each visit and 2 annas per mile for the distance travelled, unless a suitable conveyance is provided to and from the patient's house and 3 annas for medicines. The medical officer not to be required to travel more than 10 miles unless there is railway communication, when his fare accord ing to the scale laid down by Government for the travelling of officers of his class shall be paid in addition to the fee and charge for medicines. For attendence at the patient's house in the same town or village as the dispensary the fee of Rs. 2 only to be charged.

12. Fees for attendance on patients away from dispensaries to be the property of the officer in charge of the dispensary. Fees for attendance on patients at the dispensary and all charges for medicines to be credited to the Dispensary Fund, and to Government in the same proportions as the Local or Municipal Board and Government contribute to the dispensar y.

13. Fees for visits between sunset and sunrise to be double the above rates and to be the property of the Medical Officer.

14. Where the Medical Officer is an assistant Surgeon or an apothecary he shall be entitled to receive double the above fee.

* * * *

(By order)

(Signed) J. A. Crawford
Secretary for Berar

Hyderabad Residency
The 28th, February 1890

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ११ शके १८१३

## वऱ्हाडचें आरोग्य

वऱ्हाडचे आरोग्य खात्याचे कमिशनर डा. लिटल् यांचा त्या खात्याचा गतसालचा रपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्याची एक प्रत रितीप्रमाणें आमच्याकडे आली आहे तिचा आभार पूर्वक स्वीकार करितों. व आमच्या वाचकांस साहेब बहादुरांच्या कारकिर्दीची थोडीशी माहिती करून दिल्यास त्यांस ह्या प्रांतांतील आरोग्य खात्या संबंधीची हकिकत समजण्यास ठीक पडेल.

दर वर्षी प्रमाणें हाही रपोर्ट बराच लांबला आहे व त्या मध्यें माहितीही पुष्कळ दिलेली आहे. ह्या बद्दल रेसिडेंट साहेबांनी आपली गतवर्षी प्रमाणें यंदाही नाखुषी दर्शविली आहे. व ती कांहीं अंशी योग्यही आहे. तरी पण कॉलऱ्या संबंधानें कांहीं वायफळ गोष्टी खेरीज करून इतर बाबी सविस्तरानें रिपोर्टांत आल्या पासून बराच फायदा होणार आहे व लोकांस आरोग्या सारख्या महत्वाच्या विषयाचें ज्ञान जितकें अधिक होईल तितकें इष्ट आहे असो. गतसालीं १११४५० मुलें जन्मलीं ह्मणजे तिगस्ता पेक्षां ७६७० मुलें अधिक जन्मास आली. जनन मरणाची नोंद १८६९ सालीं ह्या प्रांतात सुरू झाली. तेव्हां पासून दर वर्षीचे आंकडे ह्या रिपोर्टांत दिले आहेत त्या वरून सहज दिसून येणार आहे कीं प्रजोत्पत्ति जारीनें वाढत्या प्रमाणावर सुरूं आहे, कारण, १८६८ सालीं हजारी १८, १८७८ सालीं. हजारी ३४, १८८८ सालीं हजारी ४१ व १८९० सालीं, हजारी ४२ ह्या प्रमाणें जन्माचें मान बसलें आहे. रिपोर्टच्या सालीं जन्मास आलेल्या मुलांपैकीं ५७५१९ मुलगे होते व ५३९३१ मुली होत्या, ह्मणजे ३५८८ मुलगे जास्ती पैदा झाले असें मुलाचें वाढतें प्रमाण दर वर्षी असून लग्नाचे वेळीं मुलीस वर मिळण्याची अडचण नेहमीं ऐकण्यांत येतें, हें कसें? मुलीं पेक्षां ७३० मृत मुलगे जननीच्या उदरांतून तिला व्यर्थ शिणवून बाहेर आले. ही संख्या इतकी वाढती असण्याचें कारण साहेब बहादूर असें सांगतात कीं, मुलीं पेक्षां मुलांची शरीर कांठी जाड व मोठी असते उन्हाळ्यापेक्षां व वऱ्हाडांत पावसाळ्या पेक्षां थंडीच्या दिवसांत गर्भ धारणेचा संभव विशेष असतो व ह्मणून जुलै, आगष्ट व सप्टेंबर ह्या महिन्यांत उत्पत्तीची संख्या अधिक असतें असें साहेबांचें ह्मणणें आहे व तें बरोबरही आहे.

मागील सालीं ९३०२० माणसें मेलीं. व तिगस्ता ११११५६ माणसें मेलीं होतीं. जननाचें प्रमाण वाढतें व मरणाचें प्रमाण कमी अशी स्थीति जेथें आहे तेथें लोक संख्या वाढत जाईल ह्यांत मोठें नवल नाहीं. व ईश्वरास काळजी नसेल तर अशा शांततेच्या काळांत व अगोदरच दारिद्र्यानें गांजलेल्या लोकांस हें वाढतें प्रमाण काळजींत टाकणारें होणार आहे. पटकी सारख्या भयंकर रोगांचा सुद्धां आदर करण्यास, कित्येक तयार असतात ह्याचें कारण हेंच होय. असो. नुकत्याच झालेल्या मनुष्य गणतीला अनुसरून जर हा रिपोर्ट तयार झाला असतां तर मिळाली आहे त्या पेक्षां अधिक योग्य माहिती आपणांस मिळाली असती व मरणाची संख्या गतसालीं दुसऱ्या सालां पेक्षां फारच कमी होती असें दिसून आलें असतें. ५१६० पुरुष बायका पेक्षां अधिक मेले. मरणाच्या एकंदर संख्येपैकीं एक वर्षाच्या वयाच्या आंतील २३८४३ मुलें मेलीं ह्यावरून सहज दिसून येईल कीं, इतर वयापेक्षां बाळपणांत पुष्कळ मुलें मरण पावतात. ह्याचें कारण साहेब बहादुरांनीं कोठें दिलें नाहीं. बालविवाहाची चाल हें जबर कारण आमच्या चवकस साहेबांच्या लक्षांत तेव्हांच यावयास पाहिजे होतें. आ साहेब आपल्या आश्रयास एखाद दुसरे सुधारणाप्रिय गृहस्थ जर ठेवतील तर त्यांस त्यांचा बराच उपयोग होणार आहे.

ह्या सालीं कालऱ्याची आमच्या प्रांतावर फार मेहर नजर होती. तरी ८२४ लोक ह्यानें आमच्यांतून ओढून नेले. महामारीची उत्पत्ति कशा पासून असावी ह्याचा शोध लावण्यांत साहेबांचें मन ब... वेधलें आहेसें दिसतें व मागल्या रिपोर्टाच्या लांबीबद्दल रेसिडेन्ट साहेबांकडून ठपका आला असतांही प्रस्तुतच्या रिपोर्टांत बऱ्याच सविस्तर रीतीनें कालऱ्याची माहिती दिली आहे.व शेवटीं 'खरें कारण काय असावें कोण जाणें ' असेंच ह्मणावें लागलें आहे. वायव्येकडील प्रांतांतील अधिकाऱ्यांनीं पिण्याचें पाणी उघडें राहिल्यानें ह्या रोगाचा प्रसार होतो असें ह्यटलें आहे. ह्याचा विचार आमचे डाक्तर सा-

हेब करतीलच. देवीच्या आजारांचीही मोठी मेहर नजर ह्या सालीं होती कारण फक्त ३२४ लोक ह्या आजारानें मेले. नवरीनें देवी काढण्याचा कायदा लागु करण्यानें विशेष फायदा होईल असें साहेबांचें ह्मणणें आहे व त्याला कमिशनर साहेबांचें अनुमोदनही आहेसें दिसतें; परंतु देवी काढल्यापासून रक्तपितीचा फैलाव होतो असा जो एक वूट निघाला आहे त्याचा निकाल लागेपर्यंत तरी आमचे अधिकारी स्वस्थ बसतील अशी आशा आहे.

वऱ्हाडांत आठ म्युनिसिपाल कमिट्या आहेत व त्यांचें उत्पन्न २२७२३२ रुपये आहे त्यापैकीं आरोग्याकडे १०३१८३ रु. खर्ची पडले. लोकांच्या सोईसाठीं ह्मणून जमविलेल्या पैशापैकीं निमेपेक्षां पुष्कळ अधिक पैसा तिकडे खर्च होणें रास्त आहे परंतु शाळाखात्यासारख्या जबरदस्त खात्याचा भार सरकारास आपल्यावरचा कमी करितां यावा कसा? आमच्या म्यु. कमिट्या सोनखत जर तयार करतील तर शेत व मळे ह्यांस त्याचा चांगला उपयोग होऊन त्यांचें उत्पन्न वाढेल. फक्त ह्या खताचे पुण्याच्या म्यु. कमेटीस पंचेचाळीस हजाराचें उत्पन्न आहे. अगोदर कांहीं वर्षें ह्याचा खप कदाचित कमी होईल परंतु पुण्या प्रमाणें खत तयार करण्याची पद्धत येथें चालूं होणार आहे व घाणीपासून रोगराई उत्पन्न होण्याचीही भीति कमी होणार आहे. ह्यासाठीं म्यु. कमेट्या नाहींत अशा गांवांतून व खेड्यांतून आरोग्य रहावें ह्मणून ११९६२१ रु. खर्च झालें.

डा० लिटल साहेब साडेसात महिनें दवऱ्यावर होते ह्या वरून त्यांच्या श्रमाचा अंदाज करतां येणार आहे. व कर न बसवितां म्यु. कमेट्यांचें उत्पन्न वाढवून आवश्य लागणाऱ्या सुधारणा करण्या बद्दल जी साहेबांनीं सुचना केली आहे त्यावरून आमच्या बद्दल आ साहेबांस बरीच काळजी आहेसें दिसून येतें व त्याबद्दल आह्मांस त्यांचे आभार मानले पाहिजेत. मि. मारुती कडताजी शेगांवचे पाटील ह्यांस रावसाहेब हा किताब देण्याबद्दल ह्या रपोटांत शिफारस झाली आहे. रस्ते साफसूफ ठेविल्यानें रावसाहेबी मिळवितां येईल अशी अजून तरी कोणाची कल्पना झाली नाहीं. गुणावगुणाकडे फारसें लक्ष न देतां सोंपवलेलें काम योग्य रीतीनें बजाविलें ह्मणून एकदम योग्यतेच्या बाहेर बक्षीसें बहुतेक भोळ्या अधिकाऱ्याकडून दिलें गेल्याची उदाहरणें आपणांस बरींच सांपडतील.

## लोखंडी तिजोरी.

लोक आप[illegible] पैसा सुरक्षित रहावा ह्मणून लोखंडी तिजोऱ्यांतून तो ठेवितात परंतु आह्मांस एक न[illegible] तिजोरी आढळली आहे ती निराकार असून लोखंडी तिजोऱ्यावर सरशी करिते आणि या [illegible]वीन तिजोऱ्यांतील संचय वृद्धिंगत होत असतो. तसा खरोखर विचार केला तर ही निरवय तिजोरी अनुभवास लोखंडी स्वरूपानेंच येत आहे हें खालील हकीकतीवरून दिसेल.

आजपर्यंत वऱ्हाडांत कोणत्याही ट्रेडींग कंपनीनें व्यापार केला नाहीं असा लोखंडाचा व्यापार 'उमरावती ट्रेडींगकंपनी लिमिटेड' या नांवाच्या कंपनीनें सुरूं केला त्यांस सुमारें तीन वर्षें होऊन गेलीं. प्रत्येक शेअर पंचवीस रुपयांचा या प्रमाणें वीस हजार भांडवलाची कंपनी उभारली आहे. एकंदर शेअर ८०० असून त्या पैकीं १८७ भरले आहेत तरी गेल्या दोन वर्षांच्या हिशोबा वरून लोकांची पूर्ण खात्री होईल कीं, एकंदर भांडवला पैकीं एक चतुर्थांश भांडवलाहून ही कमी रकमेवर या कंपनीस गेल्या दोन्ही वर्षांत अनुक्रमें दर साल दर शेकडा १७॥ व १८ रुपये व्याज पडलें आहे. आमच्या मतें नफा फार भारी प्रमाणावर आहे त्या अर्थीं लोखंडाचा नवीन आरंभिलेला उद्योग निश्चयें करून चांगला फलद्रुप होईल. गांठीं बांधलेला पैसा वरील उद्योगाहून अधिक किफायतीच्या व भांडवलाच्या बिनधोकपणा संबंधानें अधिक खात्रीच्या धंद्यांत घालतां येण्यास लोकांस भरंवसा देण्या सारखी आम्हांस सध्यां अन्य व्यापारी मंडळी वऱ्हाडांत ठाऊक नाहीं. दोन वर्षांचा अनुभव व त्यांत कंपनीं जवळील त्रोटक गोळा झालेल्या भांडवला वरील फायदाही दोन्ही लक्षपांत आणतां आमची पूर्ण आशा आहे कीं लोक असल्या उद्योगवृद्धीसाठीं आपल्या पैल्या मोठ्या दिलदारीनें खुल्या करितील. आतां हेंही कळविणें आवश्य आहे कीं जमा झालेल्या ४६७५ रुपया शिवाय कंपनीनें व्यापाराच्या सोयीसाठीं माल खरेदी केला आहे त्यामुळें लोकांचे देणें रु. ६०३३-०-९ निघालें आहे तरी हिशेबाच्या अखेरीस रुपये ९४५६-५-९ इतक्या किंमतीचा माल शिल्लक आहे. या कंपनीचे डायरेक्टस वऱ्हाडांतील सन्मान्य, विश्वासनीय व श्रीमान असे हे तिघे गृहस्थ आहेत ते येणें प्रमाणें:—मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. एल. एल. बी, गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल. एल. बी. व रामचंद्र रेणको डोळे साहुकार.

रा. रा. रामचंद्र आबाजी पऱ्हाळकर असि. मास्तर हायस्कुल यांनीं प्रथम अकोल्यास ट्रेडींग कंपन्याची वऱ्हाडांत कल्पना काढिली आणि तिचें अनुकरण करून लोकांनीं वापरावयास अवश्य लागणाऱ्या जिन्नसांचे व्यापार सुरूं केले आहेत. वरील उमरावती मंडळीनें लोखंडाच्या व्यापाराची निराळी व उत्तम अशी दिशा काढली आहे आणि त्याबद्दल ते लोकस्तुतीस व लोकाश्रयतेस विशेष पात्र आहेत.

गेल्या औद्योगिक परिषदाच्या समयीं राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं दाखविल्या प्रमाणें हिंदुस्थान देशांत व मुख्यत्वें करून वऱ्हाड प्रातांत पुष्कळ पैसा जवाहरादि दागिन्यांतून व भुपारांतून व व सरकारच्या पोस्टल व इतर ब्यांकेंतून व्यर्थ लोळत पडला आहे तो व्यापारांत घालण्यास लोकांचा धीर होत नाहीं कांकीं सर्फ ठार बुडण्याची त्यांस फार भिती वाटत असते. तर आमच्या मतें प्रांतिक सरकारनें चांगल्या अब्रुदार व वजनदार लोकांनीं उभारलेल्या उद्योगांत आपल्या तिजोऱ्यांतूनें कांहीं पैसा भांडवल निमित्तानें देण्याचें योजिलें तर सरकारच्या नांव लौकिकावर लोकविश्वास टेऊन व्यापार धंदे करूं लागतील. आम्हीं मागणी केली आहे यांत कांहीं विलक्षण म्हटलें नसून खुद्द निजाम सरकारनें या सऱ्हेचें उदाहरण दाखवून दिलें आहे किंबहुना निजाम सरकारच्या तिजोरींत साालिना वऱ्हाड प्रांताची शिल्लक जमा इंग्रज सरकार पोंचविते ती आमच्या इलाखे सरकारांतून निजाम खाविंदापासून प्रांतांतल्या व्यापार वृद्धीसाठीं मागून घेतल्यास ही तसा व्यय करितां येण्यासारखा आहे; परंतु ही गोष्ट कितपत साध्य होईल हें आम्ही आजच सांगूं शकत नाहीं.

सारांश, 'उमरावती ट्रेडींग कंपनी लिमिटेड' या संज्ञेच्या कंपनींत ज्या कोणास सामील त्यांनीं बिनहरकत पंचवीस रुपयापासून तीं हजार दीड हजार पर्यंत तरी निदान आपला पैसा हे शेअर्स विकत घेण्यांत घालावा. विशेष तपशिलवार माहितो पाहिजे असेल त्यांनीं सदहू कंपनीचे चिटणीस रा. रा. गणेश विनायक पुरोहित यांच्याकडे परभारें पत्रव्यवहार करावा ह्मणजे त्यांच्या सर्व शंका निवारण होऊन इत्थंभूत माहिती मिळेल.

---

# The Berar Samachar

**MONDAY, SEPTEMBER 28, 1891**

We have quoted in our last number the views of Colonel Mackenzie with respect to the condition of the peasantry in Berar. The agriculturist is better now than he has ever been before. This is the view of the learned judge and he naturally dissipates the idea about the necessity of any legislative interference in regard to the well-being of the land-owners in the province. We can ouly afford to state in general way the facts we have to face in our every day life. We experience a sort of deteriorating influence that threatens to assume the manifest aspects of poverty in no distant future. Berar is purely agricultural and we therefore live simply by the chances of the land produce. There is a significant minority of those who have the pleasure of ornaments and luxuries while the overwhelming majority of the people live from hand to mouth. Though the wants of an agriculturist are few and far between he is hardly in a position to satisfy all of them. We say a calling good and remunerative if it secures a competence of comfort with a minimum of savings sufficient for our old age. But the business of an agriculturist is not of such a promising nature. His family is increasing while the means of maintenance are becoming less and less adequate. The influx of people from other provinces have aggravated these miseries. A quarter of a century before there was ample land with a limited number of cultivators. Progress of rapid and new cultivation of waste lands and that of the Forest-system of Government have strained the circumstances to a great extreme. These causes first strengthened the prices in the market of the land produce. Men became rich for a short time. But the prices still rule high and labour has been dear and costly. The purchasing power of a silver coin is greatly hampered and it is just the same if one is four times as rich as he was before. The days of plenty are no more. The peasantry have hardly the store of good grains sufficient to hold them against one bad season. They are lucky enough that they have no famines. One failure of crops is quite enough to bring them to the brink of starvation. Besides agriculture in Berar has advanced to a stage when every 'successive dose of capital and labour, applied to land yields a less and less return. We beg to bring this fact to the notice of Colonel Mackenzie because we are afraid of a new survey and assessment according to the conference held in January of 1890 under the presidency of Sir Edward Buck. We shall have to call upon as him as the direct head of the province— we hope shortly to see him elevated to that rank— to protest against any new changes that will affect the interests of the sinking ryots under the growing demands of Government in the shape of taxation. With respect to the position of an agriculturist as well as an artizan we shall refer Colonel Mackenzie to the able papers read by Mr Beauclerk and Rao Bahadur Ranade at the last Industrial Conferenee of Poona. When population increases a very healthy check lies in raising the standard of comfort. To effect this in Berar the educationel agency is cripple and inefficient.

The agriculturist is then in a fix. He has to work hard-at a stretch of long hours from day to day. He can hardly lend himself to appreciate the refinements of modern times. The stress of difficulties is often too much for his poor nerves. He has to borrow money. The Marwari or the Indian jew lends him as much as he wants at a very high rate of interest. He has no risk of capital since he secures it on the stability of the landed property of his debtor. Though there are bad debts in their books the money-lenders as a class have never failed in their enterprise of crushing usury. There has been generally transfers of lands. A glance at the estates of these hated bankers of the society will apprise us of the nature and extent of such transfers. Government ought certainly to interfere. Their measure should not be like that of the agriculture Relief Act. It was of no avail without the institution of an agricultural bank.

A minor proposal of vital importance would be to abolish the *Sutta trade* in the province. The trade, if so it be called, is gambling indeed. It has defrauded many a peasant of the rich crops in his fields to be sold away at very low rates compared with the market prices. A liberal policy should be adopted in regard to *Tuccavi loans* so that the peo- may have the advantages of a Government agricultural bank at a minimum rate of interest.

Debts are generally created, when the agriculturist is hard of money to supply his family with the necessary exp[illegible]ses or to litigate in courts. When his p[illegible]erty which is as dear to him as his life [illegible] attacked he sells every thing to *gamb[illegible]* in the Court. We called it gambling [illegible]ecause he is ignorant of the laws of p[illegible]perty and the requirements of evidenc[illegible] [illegible]nd tries the chance of his luck. Whe[illegible] property is set at an enormous valu[illegible] it is but natural that there should spri[illegible] up hostile interests to induce the p[illegible]ssible claimants to a property to get the most of law. The Judicial Commissioner's remark about the condition of the vatandars states how the matter stands but suggests no remedies to remove the grievances of them. He is closely watching their interest and is li[illegible]el[illegible] to give a listening ear to the dema[illegible]s of the Vatandar Sabha.

( to b[illegible] continued )

---

The 'Bangbas[illegible] which had to stand a second trial at t[illegible] next sessions of the Calcutta High C[illegible]urt asked pardon for the seditious writings in question and it was generous of the Bengal Government to

grant it with a warning for the future. Whatever that paper published was honestly meant but tended to produce disaffection among the subjects of Her Majesty. The case was first framed in order to find out whether Sec. 124 A of the Indian Penal Code is a workable law. It is *manifestly* so now and even in the last sessions of the High Court 7 were in favour of this view against 2 in the jury. In approving of the Lieutenant Governor's proposal of forgiveness the Viceroy has attempted to justify the liberties of the Prese which is the right-hand organ of the Government in all matters of public concern but has cautiously worded his assent to set that freedom within due bounds of legal and constitutional ways. This glad news comes to us as a matter of personal satisfaction and we are obliged to the Government that it was not *vindictive* in the trial of the Bangbasi. We hope to see our Babu gentlemen prosper in their ways of public utility with the new lights of loyalty dearly bought.

No one liked the unmerited annexation of the Manipur State but the native rule as it will be allowed to exist, is nothing short of annexation. The Sanad published below will enlighten our countrymen on the new state of Manipur.

*Sanad (Manipur)*

The Governor-General has been pleased to select you, Chura Chand, son of Chowbi Yaima, to be Chief of the Manipur State; and you are hereby granted the title of Raja of Manipur, and a salute of eleven guns.

The Chiefship of the Manipur State and the title and salute will be hereditary in your family; and will descend in the direct line by primogeniture, provided that in each case the succession is approved by the Government of India.

An annual tribute, the amount of which will be determined hereafter, will be paid by you and your successors to the British Government.

Further you are informed that the permanence of the grant conveyed by this *Sanad* will depend upon the ready fulfilment by you and your successors of all orders given by the British Government with regard to the administration of your territories, the control of the hill tribes dependent upon Manipur, the composition of the armed forces of the State, and any other matters in which the British Government may be pleased to intervene. Be assured that so long as your house is loyal to the Crown and faithful to the conditions of this *Sanad* you and your successors will enjoy the favour and protection of the British Government.

PLEADER'S EXAMINATION FOR 1891.

Hindu and Muhammadan Law

I Gives a very brief outline of Mayne's opening chapter "on the nature and origin of Hindu Law" and detail the practical results of the discussion set out by him in the concluding paragraph.

II What was the question of adoption decided in the Ramnaad case (collector of Madura versus Mootoo Ramalinga)? How was it decided and on what grounds?

III What was decided in Madan Thakur versus Kantoo Lal and how is this decision reconeiled with the decision in Deendayal vs Jugdeep Narain.

IV What three conclusions does Mayne arrive at after discussing the question of the devesting of estates on adoption by a widow.

V What does Mayne say in regard to the maintenance of a wife by her husband.

VI An A Mahammadan dies leaving two wives B. and C. B. has one daughter. C. has two daughters. A during his life time made a gift of all his property including money and jewels to B. in him of the dower stipulated for her at her nuptials. B. and C. after A's death enter into a dispute relative to the suecession to its property.

Under these circumstances is the gift valid or in what proportion should the estate be divided.

VII What differences are there in different schools of Hindu Law in regard to the order of succession of daughters when there is more than one daughter and in regard to their rights as against each other after succession.

VIII What is the nature of the estate taken by a daughter according to the different schools of law? How is the difference arrived at?

X What are the rights of women in respect to and at the time of partition in differeut parts of India.

X How does an adoption in the Kritima form differ from an ordinary adoption, in the circumstances necessary to its legality and in its results.

## वऱ्हाड.

हवामानः— पाऊस पुष्कळ होऊन कोसा झाला आहे. नद्या, ओढे व नाले यांस मोठे पूर आले आहेत. अतिवृष्टि होण्याची भीती पडली आहे. ईश्वर करो आणि तसा दुर्धर प्रसंग न येवो. सर्दी, वाईट हवा, ओलसर जागा व घरादारांची पडझड या मुळें लोकांच्या आरोग्यास धक्का पोंचेल कीं काय न कळे.

( रेसिडेन्सी आरडर वरून )

रा. रा सदाशिव भास्कर तहशिलदार यांनी पेनशन घेतल्या कारणानें त्यांच्या केळापूरच्या जागीं रा. रा. विठूजी नारायण यांस वर्ग ४ अक्टिंग तहशिलदार नेमिलें.

उमरावती जिल्हा बोर्डांतील सभासदा पैकीं दहाजण जुने निघून त्यां ऐवजीं नवे निवडण्यांत आले ते येणें प्रमाणें:—

जुने सभासद—रामचंद्र रेणको, रामराव बाजीराव ( उमरावती तालुका ]; खुशाल रामजी साटरगांव—पाटील, दादु लक्ष्मण तीवसा—पाटील, गोविंद अनंत अंजनसिंगा—देशपांडे 'चांदूर तालुका '; अमृतराव खुशाल मुर्तिजापूर देशमुख, शेखराम व्यंकाजी 'मूर्तिजापूर तालुका '; पंढरी रामचंद्र पिंपळखुटें—देशपांडे, शिवराम वासुदेव बिलुरा—पांडे, बकराम रायमलजी रायपूर—पाटील [ मोर्शी तालुका ].

नवे सभासद— देवराव जानोजी, रामराव बाजीराव ( उमरावती ); दामोधर मल्हार मंगरूळ—देशपांडे, यशवंत भवानजी विरुळ—पटेल, नारायण गोविंद दत्तापूर—देशपांडे( चांदूर ); अमृतराव खुशाल, आकाजी बळवंत ( मूर्तिजापूर ) पंढरी रामचंद्र, शिवराम वासुदेव, बकराम रायमलजी 'मोर्शी '

वाशीम जिल्हा बोर्डांतील सभासदांत झालेला फेरफार येणें बरहुकूमः—.

जुने—भरतराव कृष्णराव, लछमीराम नानकीदास, कौंपली, ( वाशीम ); नागोराव भगुराव पेपली, इशान महमदखान पुसदकर ( पुसद ); नारायण सिदोजी तारळा [ मंगरूळ ]

नवे— शेषराव आगु, शिरपूर, शिवलाल बदरी नारायण नगरदास, ( वाशीम ); नागोराव भगुराव, अमृतराव बापूजी वैणकर ( पुसद ); चंद्रभान भवानजी, सोहाळ ( मंगरुळ ).

मुंबईच्या ग्रयांट मेडिकल कालेजांत अभ्यास करणाऱ्या वऱ्हाडांतील स्कालरशिप मिळविलेल्या विद्यार्थ्यांस ती स्कालरशिप आज तागाईत चार वर्षें पर्यंत मिळत असे त्या ऐवजीं पांच वर्षे मिळत जावी अशी योजना झाली आहे.

शेट शापूरजी विरजी एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस आसि. कमिशनरचे पूर्ण रेव्हिन्यु अधिकार देण्यांत आले आहेत.

रा. रा. गोविंदराज मुदलियार ए. असि. कमि. यांस क्रिमिनल प्रोसिजर कलम २६० यांतील दुसऱ्या पोट नियमाखालीं येणाऱ्या खटल्यांची चौकशी करण्याचा अधिकार दिला आहे.

चांदूर तालुका बोर्डांत रा. रा. त्रिम्बक खुशाल यांनीं राजिनामा दिल्यामुळें त्यांच्या जागीं शेखबन्नु वल्लद शेख फसल पाठणपूरचे इनामदार यांस नेमिलें आहे.

वाशीम तालुका बोर्डांतील रा. रा. सदबसयाजी शिरपूरकर हे निवर्तल्यावरून त्या जागीं रा. रा. चिमणराव त्रिम्बक रिसोड यांस निवडण्यांत आलें आहे.

रा. रा. हैदरअली अब्बाची यांची मलकापुरास बदली झाल्यामुळें रा. रा. इ. मार्शल ए. असि. यांस बुलढाणा जिल्ह्याचे डिस्ट्रीक्ट रजिस्ट्रार नेमिलें आहे.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे, तहशिदार व वर्ग २ चे मॅजिस्ट्रेट, वणी यांस अकूच्या आकटा खालीं येणाऱ्या त्या जिल्ह्यांतील खटल्यांचा निवाडा करण्याचा अधिकार मिळाला आहे.

सन १८९०-९१ सालाचा वसूल जमाबंदीच्या रिपोर्टाची एक प्रत आह्माकडे आली तिचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों.

अलिगरचे प्रसिद्ध गृहस्थ सर सय्यद अहमदखान हे कांहीं विद्वान व सन्मान्य अशा गृहस्था समवेत हैदराबादेस निजामसरकारास मानपत्र देण्यासाठीं गेले होते तेव्हां मुसलमान लोकांच्या विद्याभिवृद्धी निमित्त अलिगर कालेजाच्या फंडाला नव्या मोठ्या फंडाची भरती करण्यासाठीं खुद्द निजाम सरकारनें महिना दोन हजार रुपयांची नेमणूक करून दिली आहे. वांगळच्या लोकांनीं २४००० रुपये वर्गणी जमवून दिली आणि त्या शिवाय अमीर उमरावांचे ही मोठमोठे आंकडे पडले आहेत. एकंदरीनें मुसलमान लोकांचा उन्नित काळ समीप येत चालला आहे.

नोटीस

रा. रा. हरी मार्तंड लायसेन्स वेंडर राहणार खामगांव यांस नोटीस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तुह्मी आमच्या घरीं आज दोन वर्षे पर्यंत स्नेह संबंधानें व घरोब्याच्या नात्यानें येत जात होता परंतु तुमचा स्वभाव किंवा गुण मला व माझ्या मुलीला काडीमात्र आवडत नाहींत इतकेंच नव्हे तर आह्मा उभयतांस तुमच्या भलाई विषयीं आंदेशा येतो व तुमचें या उपरें आह्मांस दर्शन हो नें घेण्या सारखीं कारणें दिसून आलीं आहेत त्याचा उल्लेख न करितां तुह्मास या लेखानें निश्चयानें कळविलें जातें कीं तुह्मास आमच्या घरीं येण्याची पक्की मनाई केली आहे. तुमच्या कडून या नंतर आमच्या घरीं येणें घडलें तर तुह्मावर आमच्या हद्दींत दुष्ट हेतूनें व छळ करण्यासाठीं आल्याबद्दल कायदेशीर रितीनें फौजदारींत फिर्याद केली जाईल.

ही नोटीस देण्यास दुसरें कारण आमच्या मतें असें आहे कीं तुमच्या गैरशिस्त व गैर वाजवी वर्तना शिवाय कांहीं कर्जरोख्याची भानगड रचण्यांत आली आहे असें आह्मीं ऐकतों. निव्वळ संशयावरून तुह्मास दोष लावतां येत नाहीं तरी लेखानें असें बजावून ठेवितें कीं तुमच्याशी कोणत्या ही प्रकारें देवघेव नाहीं व शिवाय कांहीं घरोब्याच्या पूर्व गोष्टींच्या वेळीं तुह्मीच आमचा बराच द्रव्यभाग चैनबाजींत उडविला. लोक बोलतात कीं माझ्या नांवानें खामगांवच्या दुसऱ्या लायसेन्स वेंडराकडून स्टांप विकले गेले आहेत त्या बद्दल कायतेशीर आह्मांस विचारणा झाली ह्मणजे त्या बद्दल जबाब घेणें नीट पडेल तेव्हां आह्मा उभयतां मालेलेको तुह्मी, तुमचे सोबती किंवा तुमच्या सल्यांतील अन्य माणूस यांचे कर्जदार नाहीं. फक्त आमची देवघेव अवघ्या गोष्टींत शेट रंगेलदास वल्लभदास गुजराथी यांच्या दुकानाशी होत असते. व त्या बद्दल आह्मी जबाबदार आहों. सरकारी कोडतांत आह्मीं वरील मतलबाचा अर्ज केला आहे परंतु तुह्मास कळविण्यास कारण कीं तुह्मास आमच्याशी आपल्या जुन्या निकट संबंधाच्या बळावर मार्गे ही कर्ज काढणें किंवा देणें याची परवानगी नव्हती तरी मागील चांगल्या वर्तनांत विपर्यास घडल्यामुळें तुम्ही कदाचित आमच्या वाईटा विषयीं प्रवृत्त व्हाल किंवा नोटीशीवर मजल पोंचविली म्हणून कांहीं कंत्राट उभाराल तर तुम्हास सरकारच्या न्याय कोर्टांत जबाब द्यावा लागेल व अब्रू नुकसांनी बद्दल फिर्यादीच्या खर्चा सकट पसा भरून पोंहोंचवावा लागेल. कळावें तारीख २७ सेपटेंबर सन १८९१ इसवी.

( सही ) गंगुबाई मर्द तुकाराम सोनार इच्या हातची बांगडी असे. ०

## वर्तमानसार.

'बंगवासी' वर्तमानपत्रा वरील राजद्रोहाचा खटल कलकत्ता हायकोडतानें पुढील सेशनावर फिरून चौकशी करण्या साठीं ठेविला होता परंतु त्या पत्र कर्त्यांनें बंगाल लेफ्टेनंट गव्हरनर पाशीं सरकार विरुद्ध आपल्या लेखा बदल माफी मागितली व ती वरिष्ट सरकारच्या मंजुरातीनें देण्मांत आली हा अत्यानंदाची गोष्ट होय.

घाठकोपरचा स्टेशनमास्तर आगगाडींतून येत असतां जवळच्या द्रव्यलोभामुळें त्याचा कोणी खून केला असें सांगतात.

रशिया मेडिटरेनियनमध्यें आल्यास, हिंदुस्थानास जाण्याचा आपला जुना केपटाउनचा रस्ताच चांगला असें वाटूं लागेल व युरोपांत लढाई सुरू झाल्यास सुएजकालवा बंद करून केपटाउनचा रस्ताच इंग्लंड स्वीकारील असें इंग्रज पत्रें ह्मणूं लागलीं आहेत.

चरचंद यास मणिपूरची सनद दिली. तुला मणिपूरचा चीफ करण्याकरितां निवडण्यास सरकारास आनंद वाटतो, तुला आतां मणिपूरचा राजा असा किताब देण्यांत आला असून ७ तोफांची सलामी औरस वंशपरंपरें चालेल, खंडणी ( मागून ठरविण्यांत येईल ) इंग्रजसरकारास दिली पाहिजे; या सनदेचा कायमपणा सरकारच्या हुकुमाप्रमाणें कारभार करण्याच्या तुझ्या वर्तनावर अवलंबून राहील; असें त्या सनदेंत असल्याचें बाहेर आलें आहे. रीतीचेंच आहे, आमचे पाटीलही याच शर्तींवर वंशपरंपरचे नोकर असतात. मात्र तोफांची सलामी व राजा किताब जास्त आहे.

पंजाबांतल्या विद्याखात्यांतल्या मोठाल्या नेमणुका या पुढें स्टेटसेक्रेटरी करणार असें सांगतात! त्यांस नेटिवांची कशी आठवण व्हावी हें समजत नाहीं ती न होण्याकरतांच ही व्यवस्था असेल असें मानण्यास कांहीं विशेष कारण नाहीं.

युरोपियन बड्या राजांनीं एकत्रपणानें चीनच्या बंदरांत चीनास धमकावण्यास जमण्याचें ठरून काय व्यवस्था करावयाची याविषयीं त्या सरकारांचा हुकूम येणे मात्र आतां राहिलें आहे असें सांगतात.

फ्रान्सच्या १,३०,००० फौजेची एक बडी कवाइत ता. १७ रोजीं झाली. देखावा सुरेख असून फौजेची हुशारी वर्णन करण्यासारखी आढळली.

पेशावर पासून काबूल नदी पर्यंत रेल्वे करण्याच्या सर्व सामानाची तयारी येत्या उन्हाळ्यापर्यंत पेशावर येथें होईल. काबूल नदी पासून काबूलहद्द किती लांब!

गिलजिंतपासून चालटपर्यंत व चापसेट पर्यंत चांगला रस्ता करण्याचा उद्योग येत्य हिवाळ्यांत होणार आहे. हें तरी सरहद्द प्रकरणच आहे. याकडे किती खर्च होणार हें कोठें बाहेर आलेलें नाहीं.

लवकर जास्त फौज मदतीकरतां पाठवा नाहीं तर आमच्या फौजेचा दंगखोरांपुढें निभाव लागणें कठीण असें मेननचमा सरकारानें टर्कीसरकाराजवळ मागणें केलें आहे,

हिऱ्याबद्दल फसविलें ह्मणून निझामानें जेकबवर जी फिर्याद केली तिची चवकशी चालू असून जेकब यास हायकोर्टानें दोन लाखांचा जातमुचलका व दोन लाखांचे जामीन घेऊन जामिनावर सोडण्याचा हुकूम केला.

ठा. अ.

## जाहिरात.

या जाहिराती अन्वयें कळविण्यांत येतें कीं, टौनहालच्या कांपौंडांत जीं बाभळीचीं वगैरे जळाऊ लांकडें जमाकरून ठेवली आहेत त्यांचा हरास, तारीख ३० सेपटेंबर सन १८९१ इ० ( बुधवार ) रोजीं सकाळीं ७॥ वाजतां होणार आहे. ज्यास तीं घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू वेळीं टौनहालांत हजर रहावें. कळावे तारीख २२ सेपटेंबर सन १८९१ इ०

Vyankatesh R. Mudaholker

सेक्रेटरी, म्युनिसिपाल कमिटी अकोलें.

## जाहिरात

आलिशान रेसिडेन्ट साहेब बहादूर यांनीं मंजूर केलेले पुढील नियम अकोलें येथील धर्मार्थ दवाखान्यास लागू केले आहेत, व ते तारीख १ आक्टोबर सन १८९१ पासून अंमलांत आणण्यांत येतील. नियम ८ अन्वयें टिकिटें देणें तीं म्युनिसिपल आफिसांतुन दिलीं जातील; व नियम ६ अन्वयें औषधाची किरकोळ किंमत घेणें ती दवाखान्यांत मेडिकल आफिसर हे घेतील. तारीख २३ सेपटेंबर सन १८९१ इ०

व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर

सेक्रेटरी, म्युनिसिपल कमिटी अकोलें.

मुलुख अमानी हैदराबाद यांतील धर्मार्थ दवाखान्यांत रोगचिकित्सा व औषध याबद्दल पडणाऱ्या फी संबंधाचे नियमः—

१. ज्या इसमांचें वार्षिक उत्पन्न ३०० रुपयांहून कमी आहे ते, व सर्व सरकारी नोकर यांस फक्त, ज्या दवाखान्याचा सर्व अथवा कांहीं खर्च सरकार चालवितें, त्या दवाखान्यांत औषधोपचार फुकट मिळण्याचा हक्क आहे.

२. ज्या इसमांचें वार्षिक उत्पन्न ३०० रुपये, अथवा ३०० रुपयांहून ज्यास्त, पण १००० रुपयांहून कमी आहे त्यांस, अगाऊ दोन रुपये फी दिली असतां, एक वर्षभर स्वतः करितां व आश्रित माणसां करितां दवाखान्यांत औषधोपचार मिळण्या करितां टिकीट देण्यांत येईल.

३. ज्यांचें वार्षिक उत्पन्न १००० रुपये अथवा ज्यास्त, पण ५००० रुपयांहून कमी आहे, त्यांस ६ रुपये दिले असतां तशा प्रकारचें टिकीट मिळेल.

४. ज्या इसमांचें वार्षिक उत्पन्न ५००० रुपये अथवा त्याहून ज्यास्त आहे त्यांस, १५ रुपये दिले असतां तशा प्रकारचें टिकीट मिळेल.

५. जो इसम १०० रुपयांहून कमी नाहीं, व २०० रुपयांहून ज्यास्त नाहीं, एवढी देणगी दवाखान्यास देईल त्यास स्वतःकरितां व आश्रित माणसां करितां दवाखान्यांत १० वर्षेंपर्यंत औषधोपचार मिळण्यासाठीं टिकिट देण्यांत येईल.

जो इसम २०० रुपयांहून जास्त देणगी देईल त्यास, त्याच्या जन्मपर्यंत त्याजकरितां व त्याच्या आश्रित माणसांकरितां दवाखान्यांत औषधोपचार मिळण्यासाठीं टिकिट देण्यांत येईल.

६. ज्या इसमांस नियम १ अन्वयें फुकट औषधोपचार मिळण्याचा हक्क नाहीं; ज्यांनीं नियम २, ३, अथवा ४ या अन्वयें फी भरली नाहीं; अथवा नियम ५ अन्वयें देणगी दिली नाहीं; त्यांस दवाखान्यांतून जें औषध मिळेल त्या बद्दल, स्यानिटरी कमिशनर साहेब वेळोवेळीं औषधाच्या किंमती ठरवितील त्या प्रमाणें किंमत द्यावी लागेल. स्यानिटरी कमिशनर साहेबांनीं ठरविलेल्या किंमतींची यादी दवाखान्यांत टांगून ठेविली जाईल.

७. नियम १ अन्वयें ज्या ज्या इसमांस फुकट औषधोपचार मिळण्याचा हक्क नाहीं, त्यांची यादी दवाखान्याची व्यवस्था पाहणारी स्थानिक कमिटी तयार करील; व टौन फंड कराचे आकारणी करितां तयार केलेल्या यादीचा उपयोग या कामासाठीं करण्यांत येईल. या यादीची एक नक्कल दवाखान्यावरील मेडिकल आफिसर यांस देण्यांत येईल; व या नियमान्वयें ज्या इसमांस फुकट औषधोपचार मिळण्याचा हक्क नाहीं, त्यांस तो न देण्याचें त्या आफिसराचें काम आहे.

८. टिकिटें दवाखान्याच्या व्यवस्थापक कमिटीच्या विद्यमानें देण्यांत येतील. टिकिटावर तें घेणारचें नांव, व ज्या मुदती करितां तें देण्यांत आलें असेल ती मुदत, हीं घालण्यांत येतील.

९. फी आणि औषधाची किंमत हीं नीट रीतीनें वसूल होऊन तीं हिशेबीं जमा होत आहेत किंवा नाहींत हें पाहणें दवाखान्याच्या व्यवस्थापक कमिटीचें काम आहे

१०. ज्यांनीं टिकिटें घेतलीं आहेत त्यांनीं औषधोपचार घेण्या करितां स्वतः दवाखान्यांत आलें पाहिजे. पण दवाखान्याचे मेडिकल आफिसर यांना योग्य दिसेल त्या रोग्या संबंधानें हा नियम त्यांनीं अमलांत न आणल्यास चालेल.

११. गांवच्या हद्दी बाहेर राहणाऱ्या एखाद्या रोग्यास औषधोपचार करण्या करितां जाणें आहे, तर त्या रोग्यानें मेडिकल आफिसरास प्रत्येक वेळ जाण्याबद्दल दोन रुपये फी व औषधाची किंमत ३ आणे दिली पाहिजे. व जितक्या अंतरावर जाणें असेल तितक्या अंतराचे प्रत्येक मैलास दोन आणे याप्रमाणें वाहनाचे ( गाडी, घोडें वगैरे ) खर्चाबद्दल पैसे दिले पाहिजेत. पण जाण्या येण्या करितां वाहनाची योजना रोग्यानें केली असेल तर हे खर्चाचे पैसे देण्याची जरूरी नाहीं. दहा मैलांहून जास्त अंतरावर जाण्याचे मेडिकल आफिसर यांस भाग पाडूं नये. पण गांव आगगाडीच्या रस्त्यावर असल्यास जाण्यास हरकत नाहीं. व अशा ठिकाणीं आगगाडीचें भाडें देणें तें, सरकारानें या दर्जाच्या आफिसरा करितां जें भाडें ठरविलें असेल तें द्यावें; व शिवाय जाण्याची फी व औषधाची किंमत द्यावी. गांवच्या हद्दींत राहणाऱ्या रोग्यांस पाहण्याकरितां जाणें असेल तर प्रत्येक वेळेस फक्त फी बद्दल दोन रुपये घेतले जातील.

१२. दवाखान्याच्या बाहेर (ह्मणजे रोग्याच्या घरीं ) रोग्यास पहाण्या बदलची फी मेडिकल आफिसर यास मिळेल. व दवाखान्यांत औषधोपचार करण्या बदलची फी व औषधाची किंमत हीं, म्युनिसिपाल कमिटी अथवा लोकल बोर्ड, व सरकार हे ज्या प्रमाणानें दवाखान्याचा खर्च चालवीत असतील त्या प्रमाणानें त्यांच्या तिजोरींत जमा होतील.

१३. सूर्यास्ता पासून सूर्योदया पर्यंत (ह्मणजे रात्रीं. रोगी जाऊन पहाण्याची फी दुप्पट घेतली जाईल. व ती मेडिकल आफिसर यास मिळेल.

१४. दवाखान्यावर, आसिस्टन्ट सरजन अथवा अपॉथेकरी दर्जाचा आफिसर असेल तर त्यास वर नमूद केलेल्या पेक्षां दुप्पट फी घेण्याचा हक्क आहे.

HEALTH, WEALTH & PROSPERITY.

जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठ्या पुतळ्या



खोटा माल घेऊन फसूं नका. खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा

प्रत्येक वस्तूवर G B. N. अक्षरें पहा.

५०८०० वर विकल्या

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगांवर करितात. ज्याच्या आंगात शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला. वा त्या पासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचाराशिवाय बरीं झालीं आहेत. या विषयीं हजारों डॉक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा क्पाटरी पासून बरे होतात. संधिवायू, शिरांगत वायू, ठणका, दांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचे दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध, आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वां जवळ असावी हें योग्य आहे. ही क्पाटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भराची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु० ३ व पुतळीस रु० २, सोन्याचे आंगठीस रु० २०; पुतळीस रुपये २२; एक डझन घेणारास एक नग ज्यास्त मिळेल. एकापासून सहा नग पर्यंत ट० ह० सहा आणे. रोख दाम असल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती करितां अर्धा आणा पाठवा.

विकत मिळण्याचा पत्ता—मुंबई—भायखळा दावणी समोर. व पुणें—बुधवार चौकांत.

जी. बी. नाईक आणि कंपनी, दावणी समोर भायखळा मुंबई.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.